शनिवार, ११ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०२  अंक -१९३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 11 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-193 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र–कर्नाटक

**राजस्थानी मल्टीस्टेट**
**को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ**
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

**तात्काळ बँकिंग सुविधा**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# इमोशनल नको, प्रॅक्टिकल व्हा

## उपमुख्यमंत्री फडणवीस : जुनी पेन्शन योजना



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जुनी पेन्शन योजना आपण आत्ता लागू केली तर आता काहीच फरक पडणार नाही. मात्र 2030 नंतर मात्र याचे परिणाम दिसायला सुरुवात होईल. मी लाँग टर्मचा विचार करत आहे. सध्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आम्ही निर्णय करणारी मंडळी नाहीत, असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात बोलताना सांगितले.**

जुनी पेन्श योजनेत निवृत्तीवेळचा जो पगार होता त्याच्या पन्नास टक्के पगार निवृत्तीनंतर मिळायचा. नवीन पेन्शन स्किम मध्ये पहिल्यांदा सरकारने 10 टक्के आणि कर्मचाऱ्याने 10 टक्के काँट्रीब्युशन देण्याचा निर्णय झाला. ज्यावेळी कर्मचारी निवृत्त होईल त्यावेळी 60 टक्के पैसे निवृत्तीनंतर द्यायचे आणि उरलेले 40 टक्के पैसे हे पेन्शन स्वरुप द्यायचे असे ठरवण्यात आले. आता जुन्या पेन्शन योजनेचा भार सहन करायचा असेल त्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ज्या राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली ते 2030 पर्यंत पैसे देतील, मात्र पुढे त्यांना शक्य होणार नाही. केंद्र पगारासाठी पैसा देत नाही केंद्र सरकार केवळ त्यांच्या योजनांसाठी पैसा देत असते. ज्या राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली त्यांच्या राज्याचा रेव्हेन्यू इतका वाढणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.

ते म्हणाले की, मी जुन्या पेन्शनच्या मुद्द्यावर सगळ्या संघटनांशी बोलायला तयार आहे. केवळ त्यांनी भावनिक होऊ नये. त्यांनी टेक्निकल बाजू समजून घ्यावी. त्यांनी सरकारची बाजू समजून घेतली की हा विषय संपेल. विरोधी पक्षाने विनाकारण विषय वाढवू नये. हा राज्याचा प्रश्न आहे. कर्मचारी संघटनांनी सामंजस्याने चर्चेला




यावे. नुकतीच एका संघटनेने संपाची नोटीस दिली आहे. मी त्यांना आव्हान करतो की, आम्ही चर्चेला तयार आहोत. लोकशाहीत कर्मचारी आदोलन करत आहेत आणि त्यामुळे विरोधकांना आनंद होत असेल तर हे योग्य नाही. भविष्यात राज्याची अर्थव्यवस्था योग्य राहावी यासाठी सर्वांनी बाबी समजून घ्यायला हव्यात. या विषयावर चर्चा करुन काय मार्ग काढता येईल यासाठी राज्य सरकार पुढाकार घेईल.

नोव्हेंबर 2005 साली नवीन पेन्शन योजना स्विकारली. मुळात ही योजना स्वीकारण्याचे कारण वेतन आयोग लागू झाले होते. त्यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट होती. ही सर्व परिस्थिती लक्षात घेत महाराष्ट्राने अतिशय जाणीवपूर्वक हा निर्णय घेतला. संपूर्ण जगात प्रगत अर्थव्यवस्थेत पेन्शन स्किम याच पद्धतीने लागू असल्याचे पाहिला मिळते. आता जुनी पेन्शन योजनेसारखी योजना कुठेही लागू नाही. कॅनडियन पेन्शन फंड सारखे फंड आपल्या राज्यात पैसा लावतात. ते सरकारला देखील पैसा देत असतात. अर्थव्यवस्था स्थिर ठेवण्यासाठी पेन्शन पगार आणि व्याज प्रदान या तिन्ही बाबीवर खर्च बॅलन्स ठेवण महत्त्वाचे आहे. या राज्यात प्रत्येकाचे कल्याण आपल्याला बघायचे आहे. आदिवासी विकास शेड्युल कास्ट विकास योजना देखील राबवायच्या आहेत, असे फडणवीस म्हणाले.



# भोपळा घेऊन विरोधक विधानभवनाच्या पायऱ्यांवर

## बजेट म्हणजे भ्रमाचा भोपळा; घोषणांनी परिसर दणाणला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बजेटमध्ये मिळाला भोपळा... महाराष्ट्राला मिळाला भोपळा... बजेट म्हणजे भ्रमाचा भोपळा...बजेट म्हणजे रिकामा खोका... सर्वसामान्यांना मिळाला भोपळा... सत्तेत कामी आले खोके, सर्वसामान्यांना मात्र धोके... अशा घोषणा देत महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायर्‍यांवर येत शिंदे सरकारच्या अर्थसंकल्पाचा निषेध केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाचा आजचा आठवा दिवस असून महाविकास आघाडीच्या आमदारांनी विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली अर्थसंकल्पावर जोरदार निदर्शने केली. राष्ट्रवादीचे आमदार भोपळा डोक्यावर घेऊनच शिंदे सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत विधानभवनाच्या परिसरात दाखल झाले. त्यानंतर पायऱ्यांवर आंदोलन केले.

# थेट 'वर्षा'वरुन आदेश : आपेगाव- पैठण रोडवरील वारकऱ्यांच्या वाटेवरील काटेरी झुडपे काढा


## दै. आधुनिक केसरीची दखल; वारकऱ्यांनी मानले आभार




आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : बांधकाम विभागाची उदासीनता; आपेगाव पैठण रस्त्यावरील काटेरी झुडपे आहे तशीच... या मथळ्याखाली दै. आधुनिक केसरी दैनिकात सविस्तर वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. याची थेट मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानावरून मुख्यमंत्री यांचे स्विय सहाय्यक शरद किरवले व शिवाजी दिवटे यांनी वारकऱ्यांच्या मदतीसाठी थेट मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानावरून संबंधित बांधकाम विभागाच्या आधिकाऱ्यांना विचारपूस केली असता सुरूवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत आपेगाव रोडच्याऐवजी तोंडोळीच्या रोडचे फोटो पाठवून दिशाभूल केली. परंतु दै. आधुनिक केसरीच्या प्रतिनिधीने गुरुवारी सायंकाळीचे रोडवरील काटेरी फोटो पाठवले, असता शरद किरवले यांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी करताच शुक्रवारी आपेगाव ते पैठण रस्त्यावरील वारकऱ्यांच्या वाटेतील काटेरी झुडपे काढण्याचे काम सुरू झाले. याबद्दल आपेगाव येथील नागरिक व वारकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे स्विय सहाय्यक शरद किरवले, शिवाजी शिंदे यांचे दै.आधुनिक केसरीच्या माध्यमातून आभार व्यक्त केले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अशिक्षित असलेल्या बहिणाबाई अहिराणीत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगून गेल्या, तर बालकवींनी आपल्या कवितांमधून रंगांची आणि निसर्ग सौंदर्याची उधळण केली. आचार्य अत्रे, पु ल देशपांडे, राम गणेश गडकरी, वि वा शिरवाडकर, वि स खांडेकर, गो नि दांडेकर, ना सी फडके, मंगेश पाडगावकर, बा भ बोरकर, भा रा तांबे आदी कवी आणि लेखकांनी अक्षर मराठी साहित्य निर्मिती केली. मराठीतील वाल्मिकी म्हटल्या जाणाऱ्या ग दि माडगुळकर यांनी अक्षर अमर गीतरामायण लिहिले. केवढी थोर साहित्यिकांची मांदियाळी आहे मराठीत ! नावे तरी किती घ्यावीत ! अशा या वेगवेगळ्या कवी आणि लेखकांनी मराठी भाषेला समृद्ध केले आहे. तरी आज अशी वेळ का येते की आम्हाला म्हणावे लागते की मराठी भाषा जगवली पाहिजे, वाढवली पाहिजे ? त्याचे कारण आम्ही तिचे पुत्र आहोत, तिचे वारस आहोत, तिचे पांग आम्हाला फेडायचे आहेत हे आम्ही कुठेतरी विसरतो. वर्षभरातून एकदा मराठी दिवस आला की आम्हाला मराठीचा अभिमान उरी दाटून येतो. पण पुन्हा वर्षभर गायब ! आमच्या मुलांना आम्ही अट्टाहासाने इंग्रजी शाळेत घालतो. मराठी शाळा ओस पडत चालल्या आहेत.

इंग्रजी भाषा म्हणून शिकणे आजच्या काळासाठी आवश्यक आहेच याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण यासाठी मातृभाषेचा बळी द्यायला हवा का याचा विचार आपण करणार आहोत की नाही ? मावशीसाठी आईचा बळी द्यायचा का ? आम्ही आमच्या मुलांना आता ' चिऊ काऊ ' नाही शिकवत. आमचा काऊ म्हणजे आता गाय. चिऊ म्हणजे sparrow. भू भू म्हणजे कुत्रा नाही. आता डॉगी म्हटले जाते. ' आई ' म्हणुनी कोणी आईस हाक मारी, ती हाक येई कानी. पण ती हाक आता नाही येत कानी. जिकडे तिकडे ' मम्मी शब्द कानावर पडतो. इंग्रजीत प्रेताला मम्मी म्हणतात. मम्मी म्हणताना ओठ मिटले जातात तर आई म्हणताना तोंड उघडले जाते. आ होतो. केवढा मोठा फरक ! ' टी व्ही वरच्या साबणाच्या एका जाहिरातीत एक छोटी मुलगी आपल्या आईला ' मम्मी ' म्हणून हाक मारते.



## आनंदी पहाट

## आपल्या संस्कृतीचे जतन होण्याची गरज

आधुनिक केसरी

आपला नव्यानं झालेला परिचय धृढ व्हावा, निर्माण झालेलं नातं वृद्धिंगत व्हावं ह्या दृष्टीकोनातून देखील ह्या नमस्काराचं महत्व आपण अनुभवत असतो. नमस्कार कोणाला, का, कधी आणि कसा करावा ह्याच्या संबंधी काही पारंपारिक रिवाज आहेत. अर्थातच वयानं, मानानं, विचारांनं, व्यवसायानं, शिक्षणानं आणि अनुभवानं जेष्ठ व्यक्तीला नमस्कार करण्याची रीत आपापल्या संस्कृतीप्रमाणे प्रचलित आहे. ह्या नमस्कारानं शुभाशिर्वाद मिळतात असं समजण्याचा प्रघात आहे. नमस्कारात प्रेम आणि विनय प्राप्त होतो, तो अनुशासन, आदर शिकवतो, मनात सुविचार येतात, क्रोध नष्ट होत जातो, अहंकार नष्ट होतो, शीतलता येते, नमस्कार दुःखाचे अश्रू पुसण्याचं काम करतो आणि आपल्या संस्कृतीचं दर्शन घडवतो. ह्या संस्कृतीचं आपण जतन केलं पाहिजे, ह्याची जाणीव नवीन पिढीतील किती जणांना असेल, हाच कळीचा मुद्दा आहे. अलीकडच्या काळांत ह्या नमस्काराचं महत्व कमी होत चालल्याचं प्रकर्षानं जाणवतं. नमस्कार करणाऱ्या व्यक्तीचा हेतू स्वार्थ साधण्याचा असल्यास त्याचं महात्म्य आबाधित राहू शकतं का ? अनेकदा नमस्काराचे सोपस्कार, हाच एक स्वतंत्र कार्यक्रम केला जातो. तशी अपेक्षा नमस्कार करवून घेणाऱ्यांची असल्याचं समजतं, तेव्हा त्यांच्यातील उणिवांचंच दर्शन होतं. खरं तर नमस्कार ज्या व्यक्तीला केला जातो त्याच्या शुभेच्छा आणि सुभाशिर्वादामुळे नमस्कार करणाऱ्याच्या उणिवा दूर होतात, त्याच्या जाणीवा जपल्या जाऊन त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आध्यात्मिक प्रक्रिया होत असल्याचं आपण समजून घेतलं पाहिजे. सद्यःस्थितीत चमत्काराशिवाय नमस्कार नाही अशी मनोधारणा झाल्याचं अनेकांच्या बाबतीत दिसून येतं. अशांमध्ये एकतर आत्मकेंद्रित व्यक्तींचा समावेश असतो अथवा कोणत्याही प्रत्यक्ष प्रचीतीशिवाय काहींना नमस्कारासाठी विश्वास बसत नसतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**आता तरी मना | सावध हो ||**
**शा हीच मुळ | दुःखाचे कारण ||**
**सुखाचे साधन | नाश तीचा ||१||**
**खोटा व्यवहार | पातकाची खाण ||**
**पूण्याईची खुण | नेकनामी ||२||**
**लटक्या संसारी | लटकेच सुख ||**
**निवारेल दुःख | भजनात ||३||**
**निरपेक्ष भाव | ब्रह्मानंद जाणा ||**
**आता तरी मना | सावध हो ||४||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


**सत्यं तदेव विश्वाम्बे**
**न हि सुखं विना कृपाम्।**
**इच्छाम्यहं कृपायै ते**
**सदा सदा सदा सदा॥4॥**
**हे जगदंबे, तेच सत्य आहे की, कृपेविना सुख नाहीच. मी नेहमी तुझ्या कृपा इच्छितो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**जग सम्बन्ध पथ नाव का, मेघ वायु संयोग। जहँ के तह सब चल भये, अन्त में होय वियोग ।।१४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/१४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** जगतातील सर्व संबंध नाव आणि यात्रेकरू समान आहेत. ज्याप्रमाणे नावेत बसलेले यात्री किनाऱ्यावर उतरताच आपापल्या गन्तव्य स्थानी निघून जातात, त्यांचा त्या नदीशी, नावेशी आणि त्यातील यात्रेकरूंशी काहीही संबंध राहात नाही, किंवा जसे वाऱ्यामुळे ढग छिन्न-भिन्न होऊन जातात तद्वतच सर्व जीव कर्मवश एका ठीकाणी एकत्र येतात आणि कर्मवश फल प्राप्त करून इतरत्र निघून जातात. सर्व जीवांचा संबंध विच्छेद होऊन जातो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

चांगले ग्रंथ वाचले आपल्या आवडीचे विचार ऐकायला मिळाले की आनंद होतो. मनाला कंटाळवाणे वाटत नाही. आपले ज्ञानरूपी भंडार वाढते. जगाची आसक्ति रहात नाही. मनात अद्वैतग्रंथाबद्दल प्रेम निर्माण होते. परमार्थ मार्ग सापडतो मोक्षाची वाट दिसायला लागते.आपोआपच निर्माण होते ती प्रिति व अंतर आत्म्याला जो दिसते ती भक्ति प्रिती आणि भक्ति यांच्या ऐक्याची पुढची पायरी म्हणजे मनाला सापडलेले आत्मज्ञान होय. आत्मज्ञानी पुरूषाला सारासार विचाराचीच खरी आवड असते. ज्याला जे आवडते त्याला ते दिले म्हणजेच देणारे आणि घेणारे समाधानी असतात. फळाची आशा करू नका असे भगवत् गीता सांगते. ऊदा द्यायचे झाले तर अनंताचे व्रत हे सकाम आहे तर भगवत गीता ही फळाची अपेक्षा सोडण्यास सांगते. यासाठी समर्थ 16 व्या ओवीत सांगतात की मल्हारी महात्म्य द्वारकेला नेले,द्वारका महात्म्य काशीला नेले आणि काशी महात्म्य जर तिरूपतीच्या बालाजीला नेले तर ते शोभणार नाही. यासाठी समर्थ वेगवेगळी ऊदा देतात जसे, रत्नपारखी समोर दगड ठेवणे योग्य नाही. विद्वान किंवा पांडित्याचा अभ्यास करणारे यांच्या समोर तमाशातील गाणी चालणार नाही. ब्रम्हचारी व्यक्तिसमोर नाचगाणे करणारी कलावंतीण शोभणार नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाचे प्रेम का येत नाही ?

आधुनिक केसरी

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास. नामाचे प्रेम येण्याला बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, "नामाचे प्रेम का येत नाही ?" तर तो सांगतो, "माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल." पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, "पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही." परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, "या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;" तर कोणी म्हणतो, "प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;" तर कोणी प्रापंचिक दुःखाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल. **आजचे बोधवचन आहे - नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे. श्रीराम समर्थ**



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ध्रु.॥**
**हरिहरां नाहीं बोटभरी वाती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥२॥**
**तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होइल नेणों ॥३॥**
**नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हा चि धंदा ॥१॥**
**देवधर्म सांदीं पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥ध्रु. ॥**
**रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ॥२॥**
**तुका म्हणे आत्महत्या रे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥३॥**

## मद्यसाठ्यासह चारचाकी जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** कारने विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या इसमास खामगाव येथील शिवाजी नगर पोलिसांनी अटक केली. या कारवाईत मदयसाठ्यासह चारचाकी देखील जप्त करण्यात आली. ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील रवींद्र कन्नर, निलसिंह चव्हाण, संतोष वाघ, सागर भगत व संदीप टाकसाळ हे काल मध्यरात्री वाहन गस्त घालत होते. त्यांनी मिळालेल्या गुप्त माहितीवरून खामगाव एमआयडीसी मधील महावितरण कार्यालया नजीक नाकेबंदी केली. यावेळी त्यांनी एम एच ०४ सीबी२२४० क्रमांकाच्या मारोती अल्टो कारची झडती घेतली.

कारवाईत १९७ विदेशी दारूच्या बॉटल्ससह चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. प्रकरणी शेख समीर शेख जमीर( वय २३, राहणार रसुलपूर, तालुका नांदुरा ) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शिवसेना बांधावर

### पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या : चंद्रकांत खैरे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी थेट फोनवर फकिरा मोरे या शेतकऱ्यांशी संवाद साधला. अवकाळी पावसाने झालेली नुकसान व परिस्थिती जाणून घेत दिलासा दिला. यानंतर उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीला शिवसेना बांधावर पोहचली. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी गंगापूर, वैजापुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन व्यथा जाणून घेतल्या. शुक्रवारी गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा, अगरवडगाव, गणेशपूर, गळनिंब, कायगाव आदी भागात पाहणी केली. यावेळी तालुकाप्रमुख दिनेश मुथा, उपतालुका प्रमुख पोपट गाडेकर, विभागप्रमुख गोकुळ तांगडे, कृषी विभागाचे कांचन शेटे, मनिशा तंगीड, ग्रामसेवक पातकाळ, तलाठी सुनील ढोले, मंडळ अधिकारी सोनटक्के, किसान सेनेचे तालुका संघटक गजानन गायकवाड, योगेश आवारे , नवनाथ काकडे, प्रदीप निरफळ, रामेश्वर नवले, सरपंच रामेश्वर चव्हाण, उपसरपंच बाबासाहेब चव्हाण, सभापती मधुकर चव्हाण, नवनाथ निरफळ, गणेश कान्हे, नानासाहेब वाघ, शेतकरी, शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना तातडीने मदत करा :** एकीकडे सरकार आपले लोक आणि सरकार वाचविण्यासाठी व्यस्थ आहे . मात्र अन्नदाता बळिराजा शेतकरी आवकाळी पावसाने संकटात सापडला आहे .हाता तोंडाशी आलेला घ्यास हिरावून घेतला . गव्हु, कांदा, फळबागा, भाजीपाला आदीं पिंकाचे नुकसान झाले . या सर्व पिकांचे पंचनामा करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या, अशी मागणी शिवसेना नेते खैरे यांनी केली .

## छेड काढणाऱ्या मजनूला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ब्रम्हपुरी शहरामधील नामांकित महाविद्यालयात शिकणाऱ्या तरुणींची छेड काढणाऱ्या एका मजनूला एका तरुणीने धाडस दाखवत पोलिसांच्या ११२ या टोल फ्री क्रमांकावर फोन केला. लगेच ब्रह्मपुरी पोलिसांनी तिच्याशी संपर्क साधत काही तासांतच मजनूला पकडून गजाआड केले. त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान ब्रह्मपुरी वखार महामंडळाजवळून एक तरुणी आपल्या राहत्या घरून महाविद्यालयाकडे जात असताना एका मजनूने तिच्या मागून मोटारसायकलने येऊन तिला अश्लील स्पर्श करून तिची छेड काढली. पीडित मुलगी घाबरून ओरडली असता त्याने पळ काढला. परंतु, एवढ्यावरच हा मजून थांबला नाही. पुढे जाऊन त्याने परत खेड रोडवर दुसऱ्या तरुणीची छेड काढली. परंतु या तरुणीने लगेच स्वतःला सावरून त्याच्या मोटारसायकलचा नंबर लक्षात ठेवला व पोलिसांच्या ११२ या फोन केला. ब्रम्हपुरी पोलिसांनी त्वरीत हालचाली करीत पीडित मुलीशी संपर्क साधला.

## परतूर पोलिस ठाण्यातच धाडसी चोरी

### चक्क पोलिस मित्रानेच केली जप्त गुटख्याची चोरी !

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** आजपर्यंत आपण सर्वजण ऐकत होतो की, विविध ठिकाणी झाली पोलिसाकडून चोरीचा तपास सुरु मात्र ईथा चक्क परतूर पोलिस ठाण्यातच चक्क चोरी झाल्याने एकच खळबळ उडालीय. ही चोरी दुसऱ्या तिसऱ्या कुणी नसुन तर पोलिस मित्रानेच आपला हात चलाखी दाखवत तब्बल अडीच लाखाचा विविध कारवाईतील जप्त केलेला गुटखा साठवणूक खोलीतून थोडा थोडा करून लंपास केला. जालना पोलिसांनी परतूर परिसरात विविध ठिकाणी अवैधरित्या चालणाऱ्या गुटखा माफियांवर कारवाई करत अडीच लाखाचा गुटखा जप्त केला होता. दरम्यान कारवाईनंतर हा गुटखा कायदेशीर प्रक्रियेनंतर नष्ट करायचा असल्याने आणि हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने गुटखा पोलिस ठाण्यात ठेवण्यात एका बंद खोलित ठेवण्यात आला होता. दरम्यान परतूर पोलिस ठाण्यातून हा जप्तीचा गुटखा अचानक गायब झाल्याने परतूर पोलिस ही चक्रावून गेले होते. मात्र परतूर ठाण्यातील परिसरात सिसिटिव्ही असल्याने त्यात हा भुरटा चोर कैद झाला असावा अशी चर्चा परतूर पोलिस ठाणे परिसरात ऐकायला मिळत होती. एवढे प्रकरण होऊनही अनेक पाणटपऱ्यांवर बिनधास्त अवैध गुटखा विक्री सुरु आहे अत्तातरी परतूर पोलिसांनी शहरासह तालुक्यातील गुटखाबंद




करावा असा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडत आहे .

तरीही सखोल चौकशी केल्यानंतर जप्त केलेला गुटखा गेल्या तीन महिन्यात तीन वेळा पोलिस मित्रानेच चोरी केल्याची धक्कादायक बाब समोर आली. या नंतर परतूर पोलिसांनी सफाई त्या पोलिस मित्रा विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला. तर हा आरोपी कुणाच्या मदतीने हा गुटखा चोरून लंपास करीत होता तसेच ठाण्यातून चोरलेला गुटखा शहरात कुणाकुणाला यांचा तपास अत्ता पोलिस करित आहेत.

## पंतप्रधानांच्या ताफ्यातील जवानाचा कालव्यात पडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** मेंढी, ता. सिन्नर येथील जवान गणेश सुखदेव गीते हे सहकुटुंब मोटारसायकलने येत असताना पत्नी व मुलांसह तोल जाऊन गोदावरी उजव्या कालव्यात पडले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पत्नी व मुलांना वाचविण्यात यश आले मात्र गणेश कालव्यात वाहून गेले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मेंढी येथील गणेश सुकदेव गिते ( वय ३६ ) हे केंद्रीय राखीव सुरक्षा बलात कार्यरत असून पंतप्रधानांच्या विशेष सुरक्षा पथकात तैनात आहेत. दि.२४ फेब्रुवारी रोजी ते गावी लग्नानिमित्त सुट्टीवर आले होते. ते पत्नी रुपाली ( वय ३० ), मुलगी कस्तुरी ( वय ७ ) व मुलगा अभिराज ( १.५ वर्षे ) हे सर्व मोटारसायकलने शिर्डीला गेले होते. गुरुवार दि.१० सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास ते गोदावरी उजव्या कालव्याने परतत होते. घर अवघे ३०० मीटर राहिले असताना मेंढी-ब्राम्हणवाडे वळणावर त्यांचा तोल गेला व मोटारसायकल



सह सर्वजण कालव्यात पडले. त्यामुळे जोराचा आवाज झाल्याने जवळच उभे असलेल्या नितीन रावसाहेब गीते व नागरिकांनी धाव घेत पत्नी व मुले यांना वाचविण्यात यश मिळवले, मात्र गणेश प्रवाहाबरोबर वाहून गेले. घटनेची माहिती कळताच सिन्नर औद्योगिक वसाहत पोलीस स्टेशनचे स.पो.नि.संदेश पवार, पो.कॉ.हिरामण बागुल, विजयसिंग ठाकुर, पो.ना.धनाजी जाधव, विनोद जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली. मालेगाव व नाशिक येथील बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. मात्र कालव्याला पाणी असल्याने बचाव पथकाला शोध कार्यात अडचण येत होती. त्यामुळे नागरिकांनी गोदावरी कालवा बंद करावा यासाठी जिल्हाधिकारी व पाटबंधारे अधिकाऱ्यांशी संपर्क साधला मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित नाफेडची बैठक स्थगित करुन पालकमंत्री दादा भुसे हे आज घटनास्थळी दाखल झाले. तातडीने कालवा बंद न केल्याने नागरिकांनी संतप्त होत ना.भुसे यांना घेराव घातला. मात्र जोपर्यंत मृतदेह सापडत नाही तोपर्यंत मी येथून हलणार नाही असे त्यांनी त्यांनी आश्वासन दिल्यानंतर नागरिक शांत झाले. आज सकाळी ११ वाजता कालवा बंद करण्यात आल्यानंतर अखेर स्थानिक नागरिक आणि एन.डी.आर.एफ.च्या चमूला आज दि.१० दुपारी २.३० च्या सुमारास घटनास्थळापासून ५०० मीटर अंतरावर मोरी परिसरात गणेश यांचा मृतदेह आढळून आला. गणेश यांचा मृतदेह शवविच्छेदसाठी सिन्नर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला असून या घटनेने सिन्नर तालुका व नाशिक जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.



# आठवलेंचा सल्ला

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार अनुभवी नेते असून, त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडावे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत काम करावे असे वक्तव्य केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले आहे. आठवले हे उस्मानाबादच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आज बीडमधील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या जिल्ह्यातील मुख्य कार्यालयाचा उद्घाटन केले. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी बोलताना रामदास आठवले म्हणाले की, शरद पवार हे अनुभवी आणि मोठे नेते आहेत. त्यांनी नागालँडमध्ये भाजपाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे त्यांनी नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करावे अशी माझी इच्छा आहे. नागालँडमध्ये पवार साहेबांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे त्यांनी आता महाविकास आघाडीमधून बाहेर पडून मोदी साहेबांसोबत काम करावे अशी इच्छा रामदास आठवले यांनी व्यक्त केली. पुढे बोलताना आठवले म्हणाले की, नुकत्याच झालेल्या नागालँड येथील निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाला दोन जागा मिळाल्या असून, जसा करिष्मा नागालँडमध्ये झाला आहे तसाच करिष्मा येत्या काळात महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत करुन दाखवणार आहे. मात्र या निवडणुकीत आपण भाजप आणि शिंदे यांच्यासोबत राहून आपल्या पक्षाचे खातं उघडणार असल्याचे आठवले म्हणाले. रामदास आठवले हे उस्मानाबादच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आज बीडमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या त्यांच्या पक्षाच्या मुख्य कार्यालयाचं उद्घाटन केलं. यावेळी रामदास आठवले हे बीडमध्ये आले असता त्यांची ओपन जीपमधून मिरवणूक काढण्यात आली होती. तर जेसीबीच्या साह्याने फुलांची उधळण करुन रामदास आठवले यांचे जंगी स्वागत कार्यकर्त्यांकडून करण्यात आले. तर नेहमीप्रमाणेच आपल्या कवितेच्या माध्यमातून आठवले यांनी शिंदे आणि फडणवीस यांच अभिनंदन केले आहे. सामाजिक आर्थिक आणि औद्योगिक यासह सर्व बाबींचा विचार करुन हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राच्या हिताचा असल्याचे आठवले म्हणाले आहेत. प्रकाश आंबेडकर यांची युती ही फक्त शिवसेनेची झाली आहे. ते अजूनही महाविकास आघाडीत गेलेले नाही. त्यामुळे मी दोन पावले मागे यायला तयार असल्याचे रामदास आठवले म्हणाले आहेत.

# पेन्शनधारक किती उच्चवर्णीय ?

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**भाजपाचे सरकार असताना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिली जाणारी जुनी पेन्शन योजना बंद केली. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन कायदा १९८२ नुसार सेवेमधून निवृत्त होणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होते. मात्र या सरकारने ३१ ऑक्टोंबर २००५ साली एक शासन निर्णय काढला आणि नोकरीमध्ये नव्याने रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्यात येऊ नये असे सांगितले. असा शासन निर्णय काढून त्यांनी खऱ्या अर्थाने कर्मचाऱ्यावर अन्याय केला आहे.**

दैनिक लोकमत दि.५ मार्च २०२३ च्या अंकात डॉ.डी. एल.कराड यांनी म्हटले आहे की, अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर २००४ मध्ये जुनी पेन्शन योजना रद्द केली व कर्मचाऱ्यांचे निवृत्ती नंतरचे जीवन समाधानाने जगण्याचा हक्कच काढून घेतला. त्यानंतर अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केली व त्याच योजनेचे मोदी सरकारने राष्ट्रीय पेन्शन योजना असे नामकरण केले आहे.

आज घडीला राजस्थान, हरियाणा, पंजाब, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश व झारखंड अशा काही राज्यात जुनी पेन्शन योजना लागू केलेली आहे. त्याचबरोबर आमदार आणि खासदार आहेत त्यांनाही ही पेन्शन योजना लागू आहे. खरे तर त्यांना ही जुनी पेन्शन योजना लागू नसायला हवी.असे म्हटले जाते की, एकदा आमदार किंवा खासदार झाले की पाच दहा पिढ्यांचे ते कमावून बसतात.जे आमदार व खासदार जनतेच्या, कर्मचाऱ्यांच्या जीवावर मानवी कल्याण साधण्यासाठी निवडून येत असतात तेच कर्मचाऱ्यांच्या जीवावर उठतात ही फार मोठी वाईट गोष्ट आहे. तेच आमदार,खासदार या पेन्शन योजनेला राजकारणाचे बाहुले बनवत आहेत. सत्ता आली की देणार नाही निवडणुका जवळ आल्या की विचार करू एकत्र बसू अशा प्रकारचे गाजर दाखवून जनतेची दिशाभूल केली जाते. आज मात्र सध्या विविध राज्यात जुनी पेन्शन योजना लागू करावी म्हणून कर्मचारी आंदोलन करत आहेत. सरकार मात्र आताही भाजपाचेच आहे. या जुनी पेन्शन योजनेला हे सरकार टाळत आहे असे नव्हे तर कडाडून विरोध करीत आहे. ही पेन्शन योजना लागू करत नाही. कारण या पेन्शन योजनेचा आर्थिक बोजा वाढतो आहे म्हणून ते देणे शक्य नाही असे उपमुख्यमंत्री मा.फडणवीस सांगत आहेत. म्हणून हे पेन्शन योजना नाकारणारे कोण आहेत ? कोणते सरकार आहे ? या सरकारची विचारधारा काय आहे ? या जुनी पेन्शन योजनेच्या विरोधात बोलणारे कोण आहेत ? या सगळ्या गोष्टींचा विचार करूनच मी माझ्या लेखाला शीर्षक दिले आहे की, पेन्शनधारक किती उच्चवर्णीय ? भाजपाचे सरकार हे लोकशाही मानणारे किंवा त्या पद्धतीने कार्य करताना दिसत नाही. लोकशाहीत मानवी कल्याण साधने हे महत्त्वाचे असते परंतु मानवी कल्याण ज्या गोष्टींनी साध्य होणार आहे त्या गोष्टीच नाकारण्याचा धडाका या सरकारने लावलेला दिसतो आहे. खरे तर २००५ नंतर नानाविध सेवेत जे रुजू झाले आहेत त्यांना जुनी पेन्शन योजना लागू नाही. कर्मचारी आपल्या आयुष्यातील तीस तीस किंवा पस्तीस पस्तीस वर्ष या देश सेवेसाठी सेवा देत असतो. तो इमाने इतबारे अनेक संघर्ष झेलून सेवा करण्याचा प्रयत्न करत असतो. आज तर नोकरीला लागताना तो अनेक रक्कम संस्था वाल्यांना व शासकीय अधिकाऱ्यांना देत असतो. या भ्रष्टाचाराला ही शासन आळा बसवू शकत नाही. यानंतर सेवेच्या मोबदल्यात कर्मचाऱ्याचा नोकरीचा कालावधी संपल्यानंतर आपले व आपल्या कुटुंबाचे जीवन सुरळीत चालावे म्हणून त्याला सरकार जुनी पेन्शन योजना देत असे. त्या काळात कमी पगार असली तरी अनेक जण नोकरी स्वीकारत होते.याचे एकमेव कारण म्हणजे नोकरी संपल्यानंतर पेन्शन मिळते हे होय. त्यांना त्या पेन्शनचा आधार फार मोठा वाटत असे. पण काही वर्षांपूर्वी ती जुनी पेन्शन योजना सरकारने बंद केली आहे त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. होत आहेत. अशाच या काळात अनेक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर त्याला मिळणारी जी डी.सी.पी.एस व आताची एन.पी.एस.योजना आहे ती त्या मानाने अत्यल्प आहे .त्या योजनेने कर्मचाऱ्यांना मूलभूत गरजाही भागवणे अवघड आहे. खरे तर भारताने लोकशाही राज्य स्वीकारले आणि या लोकशाहीत भारतीय संविधानाने सगळ्यांना शिक्षणाचा अधिकार दिला.

कारण पूर्वी फक्त शिक्षणाचा अधिकार उच्चवर्णीयांनाच होता. तेच या शिक्षण क्षेत्रात विविध पदावर कार्यरत होते. पण आता भारतीय संविधानामुळे तळागाळातील विविध जातीतील धर्मातील खेड्यावरील पाड्यावरील लोकांना शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळू लागली. आपले जीवन सुरळीत आणि सुरक्षित जगू लागले. हे पाहून मात्र अनेकांची भंबेरी उडायला लागली. त्यांना बघवेनासे झाले. त्यातूनच अशी विद्रुप मानसिकता निर्माण होऊ लागली. एवढेच काय तर तळागाळातील सर्वसामान्यांची प्रगती हे अनेकांच्या डोळ्यात खूपू लागली. त्यातूनच त्यांच्यावर कशा प्रकारची बंधने आणता येतील हे वातावरण सुरू झाले. त्यातच पुन्हा भाजपा ची सत्ता आली आणि पुन्हा या बहुजन समाजाला गुलाम करण्यासाठी ते प्रयत्न करू लागले कारण आत्ता त्यांचा वर्ग नोकरीच्या क्षेत्रामध्ये फार कमी प्रमाणामध्ये दिसतो आहे. बहुजन समाजातील नोकरदार खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. या जुन्या पेन्शन योजनेचा फायदा जास्तीत जास्त बहुजन समाजातील सर्व जातीतील लोकांना होणार आहे हे त्यांनी ओळखले आणि मग खऱ्या अर्थाने जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात त्यांनी राजकारण करणे सुरू केले. त्यांची सत्ता आल्यानंतर त्यांनी ज्या ज्या गोष्टी केल्या त्या त्या सर्व गोष्टी मानवता व मानवी कल्याणाच्या विरोधीच दिसून यायला लागतात. नोकर भरती बंद केली, महागाई वाढवली, खाजगीकरण केले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणले अशा विविध गोष्टीमुळे सामान्यांच्या हाताला काम राहिले नाही. त्यांचे जीवन उद्ध्वस्त होऊ लागले. त्यामुळे मा. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनाही तेच करायचे आहे. त्यांच्या मनातही तीच म्हणजे बहुजनांचे खच्चीकरण करण्याची भावना खचाखच भरलेली दिसून येत आहे. जुन्या पेन्शन योजनेची गरज खरे तर उच्चवर्णीय समाजाला नाही. कारण त्यांचे लोक नोकरीत आता नाहीतच असतील तर कुठेतरी.बोटावर मोजता येतील इतकेच. कारण त्यांचे फार मोठमोठे व्यवसाय,उद्योग आहेत. त्यांना आशा नोकरीची आणि पेन्शनची गरजही नाही. म्हणून उपमुख्यमंत्री फक्त मोठमोठे शब्द वापरून आव आणून देशाच्या विकासाला बाधा येईल ते असे होईल हे असे होईल जुन्या पेन्शन योजनेमुळे देश संकटात जाईल अशा प्रकारच्या खोट्या मोठ्या वल्गना करताना दिसतात. शब्दांची फिरवा फिरव करून जनतेची, नोकरदाराची दिशाभूल करताना दिसतात.खरेतर कर्मचारी जुन्या पेन्शन योजनेचा अट्टाहास का धरतात ? कारण सेवानिवृत्त झाल्यानंतर कर्मचारी काम करू शकत नाही. काही कमवू शकत नाही. मुलं मोठी होतात खर्च वाढत जातो. उत्पन्नाचे कोणतेही साधन त्याच्याजवळ नसते म्हणूनच तो जुनी पेन्शन योजना मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतो. जुनी पेन्शन योजनेत कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीचा शेवटचा पगार जो मिळालेला असतो त्याच्या पन्नास टक्के पगार सेवानिवृत्तीनंतर पेन्शन म्हणून दिला जातो. या जुन्या पेन्शन योजनेत महागाई भत्त्यातील वाढ मिळते. तशी योजना एन.पी.एस मध्ये नाही. एन.पी.एस साठी कर्मचाऱ्यांना नोकरी सुरू असताना पगाराबरोबर दहा टक्के( वाढत जतो ) पगार द्यावा लागतो मग त्यात शासनही चौदा टक्के रक्कम टाकते. यामध्ये महागाई भत्यातील वाढ मिळत नाही. परंतु सेवानिवृत्त झाल्यानंतर एन.पी.एस मध्ये कर्मचाऱ्यांना आपला उदरनिर्वाह भागवता येईल एवढी ही रक्कम मिळताना दिसत नाही.( ही योजना शेअर बाजाराशी निगडित असल्याने कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय करणारी आहे. दै.लोकमत ५ मार्च २०२३ ). चतुर्थ श्रेणी वर्गातील कर्मचारी यांचा पगार तर अतिशय कमी असतो.तो सेवानिवृत्त झाल्यानंतर काय करणार ? एन.पी.एस. योजनेत त्याला किती पेन्शन मिळणार ? त्याचा घर खर्चही भागेल की नाही सांगता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे.म्हणूनच कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना मिळावी म्हणून हे आंदोलन उभे केले आहे. या देशाची, समाजाची खरी सेवा करण्याचे कार्य कर्मचारी वर्ग करत असतो. त्याच्यामुळेच देश ही पृथ्वी सुंदर बनत असते.देश किंवा ही पृथ्वी सुंदर बनविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवनामध्ये सरकारने उदासीनता आणायलाच नको. अधिकारी लोक, आमदार, खासदारासारखे अनेक लोक भ्रष्ट मार्गाने पैसा कमावून मोठे होताना दिसतात.( सर्वच नाहीत बोटावर मोजता येतील इतकेच चांगले ) परंतु बहुतांशी कर्मचारी वर्ग मात्र इमानी ईतबारे तुटपूज्या पगारावर आपला उदरनिर्वाह भागवत भागवतच सेवा करताना दिसतो आहे. अनेकांना नोकरी संपल्यानंतर शेतीबाडी नसते, उद्योग व्यवसाय नसतो. साफसफाई करणारे कामगार यांचे काय ? अगोदरच ते तळागाळातून आलेले त्यांना कशाचाही आधार नसतो मग ते कसे जगणार ? आशा एकंदरीत २००५ नंतर लागलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी आपले जीवन कसे जगावे हा त्यांच्यापुढे प्रश्न उभा राहतो आहे.म्हणून सरकारने व मा.उपमुख्यमंत्री यांनी या सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात किंवा त्यांच्या जीवनाच्या संदर्भात विचार करून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करून न्याय देणे गरजेचे आहे. हीच खरी मानव सेवा आहे.

# नॅकची विश्वसनीयता धोक्यात

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**विद्यापीठ अनुदान आयोगाची (यूजीसी) स्वायत्त संस्था नॅशनल असेसमेंट अँड अ‍ॅक्रेडिटेशन काऊन्सिलची (NAAC) पुन्हा एकदा चर्चा होत आहे. महाविद्यालये तसेच उच्चशिक्षण संस्थांचे मूल्यांकन करताना नॅकतर्फे गैरव्यवहार करण्यात येत आहे, असा गंभीर आरोप केला जातोय. याच आरोपांची चौकशी व्हावी ही मागणी करत डॉ. भूषण पटवर्धन यांनी नॅकच्या कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. पटवर्धन यांच्या राजीनाम्यानंतर नॅकमधील कथित अनागोंदीची देशभरात चर्चा होत आहे. अनियमितता आणि गैरकारभाराच्या आरोपांमुळे राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक) ही शिक्षण क्षेत्रातील स्वायत्त संस्था चर्चेत आली आहे.**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. भूषण पटवर्धन यांनी नॅकमध्ये अनियमितता आणि गैरप्रकार होत असल्याचे सांगून, उच्चस्तरीय चौकशीची मागणी करून याच परिषदेच्या कार्यकारी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे केंद्रीय पातळीवर वाद निर्माण झाला आहे. डॉ. भूषण पटवर्धन यांनी फेब्रुवारी २०२२ मध्ये नॅकच्या कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. त्यांनी नॅकतर्फे केल्या जाणाऱ्या मूल्यांकनावर तसेच काही शैक्षणिक संस्थांना दिलेल्या ग्रेडवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन देणारे अधिकारी हितसंबंधात गुंतलेले आहेत. याच कारणामुळे गैरव्यवहार करून काही संस्थांना संशयास्पद ग्रेड देण्यात आल्याचा संशय पटवर्धन यांनी व्यक्त केला होता. महाविद्यालयांना वा विद्यापीठांना मूल्यांकनातील वरची श्रेणी मिळविण्यासाठी 'अर्थ'पूर्ण व्यवहार केले जातात, अशी कुजबुज उच्च शिक्षणाच्या वर्तुळात गेल्या अनेक वर्षांपासून होती. 'नॅक'च्या समितीतील सदस्यांची पंचतारांकित सरबराई करण्याची प्रथा तर अगदी सुरुवातीपासून होती. या पार्श्वभूमीवर 'नॅक'च्या कार्यपद्धतीवर, सुधारणांना विरोध करणाऱ्या तेथील प्रवृत्तींवर आणि गैरप्रकारांकडे लक्ष वेधल्यानंतरही मौन बाळगणाऱ्या उच्चाधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत डॉ. पटवर्धन पायउतार झाले आहेत. वास्तविक, या साऱ्या प्रकाराबद्दल भाष्य करीत डॉ. पटवर्धन यांनी राजीनाम्याचा इशारा दिला होता. मात्र, राजीनाम्याच्या त्यांच्या इच्छेला प्रत्यक्ष राजीनामा समजून विद्यापीठ अनुदान आयोगाने ( यूजीसी ) तो घाईने मंजूर केला आणि नवा अध्यक्षही नेमला! यातून एकच गोष्ट स्पष्ट होते; ती म्हणजे डॉ. पटवर्धन यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांकडे 'यूजीसी'ला आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाला डोळेझाक करायचे आहे. खरे तर या निमित्ताने 'नॅक'मधील कथित भ्रष्टाचार आणि गैरप्रकार यांची चौकशी करण्यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता होती. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भ्रष्टाचाराला संस्थात्मक रूप आलेले असेल, तर त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी समिती वगैरे नेमून शहानिशा व्हायला हवी होती. तसे काही न करता नवीन अध्यक्ष नेमण्याची कृती खुद्द 'यूजीसी' आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उच्चाधिकाऱ्यांबद्दल संशय निर्माण करणारी आहे. देशात 'नॅक' सुरू होऊन दोन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. प्रयोगशाळा, ग्रंथालय, आधुनिक वर्गखोल्या आदी पायाभूत सुविधा, प्रशिक्षित प्राध्यापक, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, उद्योगांशी संबंध, माजी विद्यार्थ्यांची मदत आदी विविध निकषांद्वारे महाविद्यालयांचे आणि विद्यापीठांचे मूल्यांकन करणे हा या संस्थेचा मुख्य हेतू. संबंधित विद्यापीठांत वा महाविद्यालयांत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि पालकांना या मूल्यांकनाचा उपयोग व्हावा; तसेच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गुणात्मक स्पर्धा वाढावी ही उद्दिष्टेही होतीच. मात्र, अगदी सुरुवातीपासून 'नॅक'च्या मूल्यांकनाच्या प्रक्रियेत वरवरच्या रंगरंगोटीवरच भर दिले गेले. इमारती किती चकाचक आहेत, प्रयोगशाळा वा ग्रंथालये किती सुसज्ज आहेत हे दाखविण्यालाच संस्थांनी अधिक प्राधान्य दिले. मूल्यांकनासाठी 'नॅक'ची समिती आली की त्यातील सदस्यांना उच्च दर्जाचा पाहुणचार देणे, काही आधुनिक वर्गखोल्या तात्पुरत्या उभारून या सदस्यांची दिशाभूल करणे, काही विद्यार्थ्यांना 'पढवून' त्यांना समितीसमोर सादर करणे असे प्रकार होत गेले. यामुळे 'नॅक'च्या मूल्यांकनाला औपचारिकता प्राप्त झाली. या मूल्यांकनामुळे प्रत्यक्षात उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर किती भर पडला, शिक्षण आणि उद्योग यांच्यातील सहकार्य कितपत वृद्धिंगत झाले आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना किती उपयोग झाला याची व्यापक पाहणी करून काळानुरूप बदल करण्यासाठी विशेष प्रयत्न झाले नाहीत. 'नॅक'चे अवडंबर मात्र वाढत गेले. सुरुवातीला समितीच्या पाहुणचारापुरता मर्यादित असलेला गैरमार्ग रुंदावत गेला. हमखास वरची श्रेणी मिळवून देणारे एजंट उदयाला आल्याची आणि त्यांनी एक समांतर उद्योग निर्माण केल्याची चर्चा वाढत गेली. डॉ. पटवर्धन यांच्या राजीनाम्यामुळे या चर्चेत आणखी भर पडून, 'नॅक'ची विश्वासार्हता कमी होण्याचा धोका आहे. या प्रकरणामुळे काही मंडळी 'नॅक'च्या प्रयोजनावरही प्रश्न उपस्थित करीत आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात प्रमाणीकरणाची गरज आहे आणि त्यामुळे 'नॅक'सारख्या संस्था आवश्यक आहेत, यात शंका नाही. त्यांमध्ये गैरप्रवृत्ती बळावल्या असतील, तर त्यांना रोखणे आणि यंत्रणा अधिक पारदर्शक करणे आवश्यक आहे. डॉ. पटवर्धन यांच्या राजीनाम्यामुळे 'नॅक'मधील गैरप्रवृत्तींचा, गैरव्यवहारांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. 'नॅक'मध्ये आमुलाग्र बदल करण्याची ही एक संधी आहे. तिच्याकडे पाठ फिरविल्यास 'नॅक'च्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे डॉ. पटवर्धन यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे शोधायला हवीत. 'नॅक'च्या अध्यक्षपदाची सूत्रे आता डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्याकडे आल्याचे आधी सांगण्यात आले असले, तरी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. अध्यक्षपदी कोणीही आल्यास, तरी त्यांना डॉ. पटवर्धन यांचा वसा पुढे न्यावा लागेल. 'नॅक'मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आव्हान न पेलल्यास, मूल्यांकन करणारी ही संस्था मूल्य हरवून बसेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# पंखातलं बळ कधीच कमी होऊ देऊ नका : सौ. लता मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालय आणि रुग्णालय येथे जागतिक महिला दिनानिमित्त चर्चासत्र आणि गुणवंतांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेच्या विश्वस्त सौ. लता मुळे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून अधिष्ठाता डॉ. लता काळे, आयुर्वेद महाविद्यालय शैक्षणिक प्रमुख डॉ. जयश्री देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे आणि डॉ गणेश डोंगरे होते.

सौ. लता मुळे यांनी आपल्या भाषणात उपस्थिताना मार्गदर्शन करताना सांगितले की स्त्रीशक्तीचा पुरेपूर वापर करून एक चांगली व्यक्ती बनवून दाखवा. आपले वाचन, लेखन इत्यादी छंद जोपासून नेहमी आनंदी रहा. कोणत्याही क्षेत्रात आपला चांगला ठसा उमटवा. आत्मनिर्भर बना. ईश्वराने दिलेल्या सुंदर स्त्री जन्माचा उपयोग करताना कधीच पंखातलं बळ कमी होऊ देऊ नका. थोर स्त्रियांचे विचार, चारित्र्य सदैव स्मरणात ठेवा. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, माता रमाई, शिक्षणासाठी झटणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, सिंधुताई सपकाळ यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक अडचणींचा सामना करत देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले. महिलांचे हक्क, शिक्षण याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक महिलांसाठी हा दिवस आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस असतो.

यावेळी डॉ. ज्योती मगरे आणि गुणवंत विद्यार्थी डॉ. यशश्री देशमुख, डॉ. पदमजा देशपांडे, अस्मिता शिंदे, झैदी सायेदा, गीतांजली भोसले, वर्षा नागरगोजे यांचा सत्कार सौ. लता मुळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुछ आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, डॉक्टर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन पायल कमलानी आणि अन्सीका फरवानी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# पु.ल. देशपांडे कला अकादमीत रंगतोय 'मी आनंदयात्री' महिला कला महोत्सव २०२३

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून पु.ल.देशपांडे कला अकादमी महाराष्ट्र शासन आणि संगीत नाटक अकादमी भारत सरकार यांच्या वतीने लोककला क्षेत्रातील आणि शिक्षण क्षेत्रातील काही मान्यवर महिलांना सन्मानित करण्यात आले. त्यात आदिवासी महिला ताई धिड्या, लावणी कलावती सिने अभिनेत्री राजश्री नगरकर, महिला शाहिर कल्पना माळी, लोककलावंत सरला नांदुरेकर, भजनसम्राज्ञी गोदावरी मुंडे, भारुड सम्राज्ञी चंदाबाई तिवाडी, शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या भावना गवळी, विद्या साठे, प्रगती भोईर, कुंदाताई पाठक यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते गौरवमुर्तीना सन्मानित करण्यात आले. शुक्रवार, १० मार्च रोजी दुपारी २ वाजता पुण्याच्या मुक्ता बाम आणि सहकाऱ्यांनी "यात्रा"- वारीचा प्रवास या कार्यक्रमाद्वारे पंढरीची वारी घडवली. त्यानंतर दादरच्या आचार्य अत्रे समितीने "अत्रे कट्टा" द्वारे महिलांशी संलग्न कायद्याची माहिती देत महिलांचे प्रबोधन केले. संध्याकाळी "व्हय! मी सावित्रीबाई" हा क्रांतीसूर्य सावित्रीबाई फुलेंवरील कार्यक्रम उज्वल मंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केला. सायंकाळी ६ वाजता संपदा जोगळेकर- कुलकर्णी आणि हर्षदा बोरकर यांनी "स्त्री" कविता/ अभिवाचन/ कथा सादर केल्या. त्यानंतर



"सॅलिटेशन डान्स अकॅडमी"च्या दीपिका आनंद आणि सहकारी यांनी कथ्थक या भारतीय नृत्यशैलीचे सादरीकरण केले. शेवटी ज्योती शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह रात्री ८ वाजता "ओवी रंग"- ओव्या जात्यावरच्या, गप्पा नात्यावरच्या हा कार्यक्रम सादर करत नात्यांचे विविध पदर उलगडले. गुरुवार, ९ मार्च पासून `मी आनंदयात्री' महिला कलामहोत्सव २०२३ या महोत्सवास प्रारंभ झाला. गुरुवारी "सौ.सुशीला पृथ्वीराज चव्हाण प्रतिष्ठान" भक्तीरंग शास्त्रीय नृत्य भरतनाट्यम ही नृत्यकला लोअर परळच्या तेजस्विनी चव्हाण आचरेकर आणि सहकाऱ्यांनी सादर केली. आव्हान पालक संघ -विशेष व्यक्तिंकरिता पालकांनी चालवलेली कार्यशाळा या शाळेच्या मुलांनी आपली कला सादर केली. सोलापूरचे स्वरश्री महिला भजनी मंडळाच्या सौ. सौ.मंगला अरुण बाबर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध कलागुण दर्शन भजनाद्वारे रसिकांना मंत्रमुग्ध केले. "नाच गं घुमा" द्वारे पनवेलच्या सौ.सुनीता खरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह अन्नपूर्णा स्तोत्र, जागर शक्तीचा, भारूड, टिपऱ्या ही कला सादर केली. डोंबिवलीचे "मी एकलव्य आर्ट फाऊंडेशन"चे समृद्धी चव्हाण, सुनीता पोद्दार यांनी ग्रुप परफॉर्मन्स सादर केला. गुरुवारची सांगता विलेपार्ले येथील रंगवेधचे कलाकार प्रस्तुत "तेथे कर माझे जुळती"कार्यक्रमाने झाली. शनिवारी, ११ मार्च रोजी दुपारी १२ वाजता "पंचमी कला अकादमी" च्या वैशाली जोशी आपल्या सहकाऱ्यांसह महिला दिन स्पेशल कथ्थकने दिवसाची सुरुवात करतील. दुपारी २ वाजता "या जगण्यावर शतदा प्रेम करावे" द्वारे शुभा जोशी सहकाऱ्यांसह सकारात्मक व आनंददायी गाणी गातील. दुपारी ४ वाजता "पु.ल.देशपांडे कला अकादमी" आणि "लोकमत" यांच्या संयुक्त विद्यमाने व सखी मंचच्या वतीने "जल्लोष आरोग्याचा" हा कार्यक्रम सादर होणार आहे. डोबिवलीच्या श्वेता राजे सहकाऱ्यांसह "सूर निरागस" हा संत साहित्यावरील मराठी वाद्यवृंद सादर करतील. शनिवारी रात्री ८ वाजता घाटकोपरच्या विधी साळवी त्यांच्या बॅंडसह फ्युजन ब्रॅंड ग्रुप द्वारे गोवा वसईची फ्युजन मधुर गाणी सादर करतील.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** दरेगाव तालुका खुलताबाद येथील तरुण शेतकऱ्याने



नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडल्याचे निदर्शनास आले. शंकर अंबादास गायकवाड वय 35 वर्षे असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार शंकर अंबादास गायकवाड यांनी शेत वस्तीवर गट नंबर 120 या शेतातील घराच्या पाठीमागील चिंचेच्या झाडाला दोरीने गळफास घेतला ही बाब त्यांच्या पत्नी शोभाबाई गायकवाड यांनी सकाळी साडेसहाच्या दरम्यान पाहिल्यावर नवनाथ बाजीराव गायकवाड यांना सांगितले असता त्यांनी त्वरित इतरांच्या मदतीने खाली उतरवून बाजार सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणण्यात आले. आणि याची खबर येथील पोलीस चौकीतील मुख्य जमादार यांना कळवली. वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अंजुमन निलोफर यांनी तपासून मृत घोषित केल्यावर मुख्य जमादार नवनाथ कोल्हे जमादार प्रकाश ठोकळ संतोष भालेराव व दिलीप बनसोड यांनी घटनेचा पंचनामा केल्यानंतर शवविच्छेदन करण्यात आले सदरहू घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुलगे एक मुलगी असा परिवार असून मुले शिक्षण घेत आहे. त्यांच्याकडे चार एकर जमिनीपैकी एक एकर बागायती वन्य कोरडवाहू असून शेतीसाठी बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखेचे व धनलक्ष्मी स्वयंसहायता बचत गटाचे अडीच लाखांचे कर्ज व जिप्सी वाहन असल्याचे कळते शासनाने कुटुंबाला आर्थिक मदत करावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

महाराष्ट्र Business Katta












# नेत्यांच्या आरोप-प्रत्यारोपांचे जोश



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**राजकारण म्हटले की नेते,पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून आरोप-प्रत्यारोप, टीका टिप्पणी हे सर्व पाहायला मिळत असते. शालूतून जोडे मारणे,शेलक्या भाषेत समाचार घेणे, मवाळ सह जहाल व आक्रमक शैलीतून एकमेकांवर ताशेरे ओढण्याचे काम राजकारणात केले जाते.परंतु आज अनेक जहालवादी नेत्यांची भडक स्वरूपातील भाषणे,त्यांनी मांडलेली मते सुद्धा लोकांपुढे येऊन गाजु लागली आहेत. शिवाय त्या गाजलेल्या भाषणास सुद्धा टीकेचे धनी बनावे लागत असते. त्यामुळे एकमेकांना बदनाम करण्यासाठी हे नेते मंडळी तयार असतात.**

नेते आरोप प्रत्यारोपातून एकमेकांचे दोष दाखविण्यासाठी जणू सज्जच झालेले असतात.

मैं बदनाम हुआ डार्लिंग ( राजकारण ) तेरे लिए अशी म्हणण्याची वेळच राजकीय नेत्यांवर आलेली असते.नेत्याच्या भाषणबाजीतील जणू आरोप प्रत्यारोप यांना इतके पेव फुटलेले आहे की, त्यांचा सामना हा प्रत्येक राजकीय व्यक्तीला करावा लागत असतो. जनता मात्र यातून स्वतःचे मनोरंजन करत असतेच. जनतेचे प्रश्न वाऱ्यावर जात असले तरी नेत्यांच्या फेका फेकी वर जनतेचे सुद्धा लक्ष असते.त्यामुळे काही नेत्यांचे बोल हे जनतेला याने बोगसगिरी आणि झोल केलेले वाटून जातात.कधी कधी जनता ही संभ्रमावस्थेत असते.राजकिय नेत्यांचा भाषणातील आरोप प्रत्यारोप इतक्या जोशाने केलेले असतात की, कोण खरे आणि कोण खोटे याचा ही विचार येतच असतो शेवटी जनता ही हे राजकारण असेच असते.

असे म्हणत कानाडोळा करीत असते. हल्ली तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात अवगत झाल्याने एखाद्या गल्लीत कोणी काही बोलले तरी ते सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर येत असते.राजकीय सभा गाजविण्यासाठी सोशल मिडिया चांगला पर्याय बनलेला आहे.टीका टिप्पणी लगेच पसरत असते. राजकीय सभा हे जणू एकमेकांच्या बदनामीचे फड असल्यासारखे गावांगावांतुन चौका चौकांतुन ह्या राजकीय सभा आयोजित केल्या जात असतात. जनतेच्या विकासाच्या नावाची बोंब करुन मते घेतलेल्या नेत्यांप्रती ना विश्वासाची आशा राहिली आहे ना हे नेते जनतेसाठी झटणारे वाटत आहेत.भाषण बाजीतच हुशार असलेल्या नेत्यांनी एकमेकांवर बोगस गिरी केलेल्या विकासाच्या नावाखाली फक्त भाषणबाजी चा विकास घडवून आणला आहे.अच्छे दिन हे भाषणबाज़ीचा जोश दाखविण्यात निर्माण केला जात असतो.

भाषणबाजीतून इथे जनतेची फसवणुक केली जात आहे.जनता कार्यकर्ते यांना हे ऐकण्यासाठी मजेशिर आणि टिंगल टवाळी केल्यासारखे वाटू लागले आहेत.कोणता नेता काय बोलतो आहे हे ऐकण्यासाठीच तर काहींची गर्दी ही कार्यक्रमात उपस्थित असताना पाहायला मिळत असते.जहाल बोलणाऱ्यांसाठी निवडणुकी रणसंग्रामातील हे स्टेज भाषण बाजीसाठी आयतेच मिळत असते. मग जहाल नेत्यांबरोबर मवाळवादी नेते ही यात भाषण बाजीचा हात मारून घेतात.परंतु हल्ली जे नेते मवाळवादी आहेत.ते ही या दरम्यान जहाल वादाचा पुरस्कार करीत जहाल भाषणे ठोकत असतात.जहाल व्यक्तींच्या नादाने मवाळ व्यक्ती ही भाषणबाजी करीत आपली मुळ छबी सोडून आक्रमकता दाखवते. थोडक्यात ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वान नाही पण गुण लागला.अशीच अवस्था मवाळांची ही जहालांच्या बरोबर राहून झालेली असते.

अनेक दिग्गज नेत्यांच्या समोर आपली प्रतिमा उजळून येण्यासाठी निवडणुकीतील जहाल फैरी मारण्याची अशी संधी पुन्हा लवकर येत नसते.हे ओळखूनच प्रत्येकांकडून टिकात्मक मांडणी केली जात असते.निवडणूक आयोगाची प्रक्षोभक आणि वादग्रस्त भाषणांवर करडी नजर असते.त्यामुळे काही मर्यादा नेत्यांना जपाव्या लागत असतात.तर काहीकडून तर जणू कुणावर ही टीका न करण्याचेच ठरविलेले दिसते असते.त्यामुळे ते आपले मौनच धरून बसलेले असतात.कुणा वर आपले आरोप नकोत.म्हणुन मवाळ भूमिका धारण करण्यात धन्यता मानली जाते.काही नेते आपली भाषणे लोकांच्या कायमची लक्षात राहतील.

अशी वक्तव्ये करण्याचा जणू विडा उचललेला आहे.सडकुन टिकांचा भडीमार हा एका नेत्याकडून दुसऱ्या नेत्यावर केला जातो आहे.नेत्यांची मजेशीर,आक्रमक भाषणे तसेच कोण कुणाची फिरकी



घेत आहेत.आदिची उत्सुकता कार्यकर्ते ही बाळगत असतात.मात्र थोडेसे कड़क उन्ह आणि अधूनमधून पडत असलेल्या पावसात ही नेत्यांच्या भाषणबाजी चा जोश ऐकण्यास लोकांची हजेरी दिसते आहे. तापलेल्या उन्हांमध्ये मोकळ्या मैदानात मंडपाच्या सावलीत किंवा कोणत्याही आश्रयाशिवाय मांडी घालून बसलेले कार्यकर्ते ही आपल्या नेत्याला ऐकण्यासाठी उत्सुक असतात.सत्तेत असलेले सरकार आणि विरोधात बसलेले विरोधक यांच्यामध्ये जेवढी खडाजंगी ही निवडूणुका नसल्यानंतर होत नसते.तेवढी ही निवडणुक रणांगणात आरोप प्रत्यारोप यांमध्ये होत असते.नेत्यांच्या रणधुमाळीची भाषणबाजी ने शाब्दिक चकमक लयभारी अशीच गाजत असते.माहोल अगदी जणू नेते हे युद्ध भूमी वर गेल्यासारखे शब्दांच्या तोफा हे धडा धडा टाकत असतात.आज किती ही जवळची व्यक्ति असो ती उद्या दुसऱ्या पक्षात गेली की पुन्हा नव्याने चुल मांडलेल्या नेत्यावर ही सडकुन आणि टिकात्मक भाषण बाजी केली जाते.म्हणजेच जोपर्यंत एखादा व्यक्ति किंवा नेता हा आपल्या पक्षाच्या आश्रयाखाली आहे. तोपर्यंत तो त्याच पक्षातील नेते कार्यकर्ते यांसाठी एकनिष्ठ समजला जातो. परंतु दुसऱ्या पक्षातील नेत्याच्या विचारांबरोबर गेला की त्याची गणती ही बंड खोरीची,गद्दारीची किंवा लाचारीची स्वार्थी प्रवृत्ती समजली जाते.

राजकारण हे असेच असते.प्रत्येक वेळी शाब्दिक टिकेची झोड ऐकून घ्यावीच लागते. स्वतःला ही इच्छा नसून ही दुसऱ्या वर टिका करावी ही लागत असते .म्हणजेच राजकारण हे असे क्षेत्र आहे की इथे सहनशीलता जपावी लागते.कुणाची कडक किंवा टिकात्मक भूमिका आली की ती एक तर प्रतिक्रियात्मक पद्धतीने द्यावी लागत असते. राजकारणात कुणी कुणाचा शत्रु आणि मित्र नसतो. परंतु राजकारणाच्या फडात इतकी आरोप प्रत्यारोपांची रंगबाजी रंगत असते की, ते जणू एकमेकांचे कट्टर शत्रु असल्या सारखे वागत असतात.खालच्या पातळीपर्यंत जाणारे आरोप प्रत्यारोप हे नंतर टिकेची धनी बनत असतात.आज राजकारणात काही नेत्यांची मुले ही स्वकीय पक्ष सोडून इतर परकीय पक्षांची वाट धरत असतात.असे केल्याने राजकारणातील काही बापकारणी मुरब्बी नेत्यांनी काही प्रमाणात मत प्रकट करण्याची इच्छा दाबून ठेवली जात असते तर काही नव्याने उमेदवारी च्या निमित्ताने राजकारणात आलेले नेते बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. बोलताना अडचणी ही येत असतात.कदाचित भाषणबाजी करण्याचा सराव नसल्याने नेत्यांचे बोल ही जनतेकडून तसेच विरोधातील पक्ष यांकडून ट्रोल केले जात असतात.कमी शब्दात जास्त आशय सांगणाऱ्या कविता ही भाषण बाजीत एक वेगळी रंगत आणत असतात.तर फ़िल्मी डायलॉग बाजी ही केली जाते.देशभक्ती, देशद्रोही, धर्मांधता आणि नक्षलवाद आदि विषय व एखाद्याला आरोपीच्या पिंजऱ्यात बसविण्याचे प्रकार हे भारतासारख्या सर्वधर्म निरपेक्ष देशात होत आहेत.हे सर्व स्वार्थी राजकारणाच्या मैफिली मध्ये होते. परंतु विकास हा गायबच झालेला आहे. तर भाषण बाजीतून ज्यांनी ज्यांनी जनतेप्रती खोटी आश्वासने दिली.नुसते आरोप प्रत्यारोप करण्यातच राजकीय कारकीर्द घालविण्यात येत असते. ज्यांच्यावर भ्रष्टाचारांचे आरोप असतात.कुणी पैसे वाटले तरी ते घ्या लक्ष्मी चा लाभ होणार आहे. अशी वक्तव्य केलेल्या नेत्यांच्या विकृत प्रवृत्तिला तसेच आजपर्यंत ज्या नेत्यांच्या भाषणाचा जोश हा होश ठिकाणावर न ठेवलेल्या नेत्यांकडून कधी कधी अनेकांची मने ही अपमानित केली जात असतात. अशा स्वरूपाची वक्तव्य सुद्धा जनतेने लक्षात ठेवायला हवीत.नेत्यांनी किती ही आरोप प्रत्यारोप केले तरी आपल्या विकासाचे सवाल उपस्थित करणे आवश्यक आहे.ही लोकं असच आपले मनोरंजन करत राहतील परंतू आपल्या समस्या जैसे थे अशा राहतील.नेत्यांनी आरोप प्रत्यारोप यांचे जोश कितीही दाखविले तरी जनतेने आपल्या समस्या सोडवून घेण्यासाठी विकासाच्या दृष्टीने मतप्रक्रियेतून आपला जोश दाखविणे आवश्यक आहे.तरच हे नेत्यांच्या आरोप प्रत्यारोपांचे जोश विकास काम करण्यासाठी कृतिशील जोश दाखवतील.

# दु:खात लपलेलं सुख शोधूया



बुध्दभूषण कांबळे
संपर्क क्र.: 7498715661

आधुनिक केसरी

**जगातील अनेक लोकांना असे वाटत असते की, जगात सर्वात जास्त दुःख हे माझ्याच वाट्याला आले आहे. जगातील इतर सर्व लोक माझ्यापेक्षा सुखी आहेत.असे अनेकांना नेहमीच वाटत असते.मी एकटाच दुःखी आहे आणि इतर सर्व लोक माझ्यापेक्षा सुखी आहेत.असा विचार माणूस नेहमी करत असतो व स्वतःला दुःखाच्या खाईत लोटत असतो.**

संत तूकाराम महाराजांनी एका अभंगात म्हटले आहे की, सुख जवाएवढे दुःख पर्वताएवढे या चार शब्दांतून संत तुकारामांनी जगाला सुख व दुःखाचे महत्व पटवून दिले आहे. आपण आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांकडे ज्याप्रमाणे बघतो, त्याप्रमाणेच आपल्या आयुष्यात सुख व दुःखाचा डोलारा उभा असतो.जोपर्यंत आपण लोभी व हावरट वृत्ती कायमची सोडून देणार नाही.तोपर्यंत आपण कदापी सुखी होणार नाही.हे आपल्याला अगोदर कळायला हवे. कारण महान विचारवंत तथागत गौतम बुद्धांनी दुःखाचे मूळ कारण तृष्णा हे सांगितले आहे. तृष्णा म्हणजे कधीही न शमणारी तहाण किंवा वासना होय. माणूस फार लोभी असतो, त्याच्या वासनांचे शमण कधीच होत नाही.अगदी मरायला टेकला तरी तो माझे माझे करायचे सोडून देत नाही.सांगायचे म्हणजे आपल्या मनासारखे घडले की,तो आनंदी होतो व आपल्या मनाविरुद्ध काही झाले की तो लगेच दुःखी होतो.त्याला हे कळत नाही की,मानवी जीवनाचा डोलारा सुख व दुःख या दोन बाबींवर आधारलेला आहे. जीवनात दुःख आहे म्हणून सुखाची चव कळते. दुख माणसाला खूप काही शिकवते.दुखामूळे माणूस कोणत्याही कठीण परिस्थितीत तावून सुलाखून निघतो.मित्रांनो आपण एक गोष्ट लक्षात घेवूया. ती म्हणजे ज्याने आपले मन सुखी व आनंदी होऊ शकते अशा गोष्टी आपण आयुष्यात केल्या पाहिजेत. खरं तर मित्रांनो आपण खास करून सकारात्मक विचार केला पाहिजे कारण सकारात्मक विचार केल्याने आपल्याला दुःखावर मात व सुखावर विजय मिळवता येतो आणि त्याचबरोबर सुखाला जिंकता येते व दुःखाला पराभूत करता येते. नकारात्मक विचाराने माणूस दुःखी होऊन स्वतःला दोष देत राहातो.मनस्ताप करून घेतो व बेचैन होतो.पण त्याला हे कळत नाही की,मानवी जीवनात दुःख आहे म्हणून सुखाची व्याख्या करता येते. सुख व दुःख या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू आहेत. सुखामध्ये दुःख तर दुःखामध्ये सुख लपलेलं असतं.इकडे जीवनात दुःख आले म्हणून रडत बसण्यापेक्षा, दुःखावर मात करून त्यात सुख शोधता आले पाहीजे.व त्यासाठी आपण नेहमी सकारात्क राहायला पाहिजे. दुख तर प्रत्येकाच्या वाट्याला येतेच पण त्याचे स्वरुप वेगवेगळे असते.त्या दुःखाची तीव्रता ही कमी जास्त असू शकते.वाईटांच्या कटकारस्थानामूळे सज्जनांचे जीवन दुःखमय बनते. परंतू समजदार ,जाणकार व सकारात्मक लोकांना याचा तिळमात्रही फरक पडत नाही.कारण त्यांची सकारात्क विचारसरणी दुःखात दडलेलं सुख शोधते व आनंदी होते. कारण त्यांना आनंदी राहण्याचे गमकच सापडलेले असते.त्यासाठी म्हणूनच आपल्याला सकारात्मक



लोकांच्या सहवासात राहता आले पाहिजे. त्यांच्याशी हितगूज साधता आले पाहिजे. चांगल्या विचारांची देवाणघेवाण करता आली पाहिजे. इतरांच्या दुःखाबरोबर आपल्या दुःखाची तुलना करावी म्हणजे आपल्याला काहीतरी समाधान मिळते. चांगला डॉक्टर, औषध, चांगली माणस व,मित्र या सर्वच गोष्टी आजारी माणसांना मिळत नाहीत.त्यांना सुध्दा दुःखाचा डोंगर फोडून सुखाला काबिज करावे लागते. आपल्या दुःखात मश्गुल असण्यापेक्षा इतरांच्या दुःखाकडे पाहिल्यास सुखद व सकारात्मक वृत्तीची ओळख होते. रसेलने त्यांच्या Conquest of Happiness पुस्तकात विचार व विवेकाने सुख जिंकावे, असे म्हटले आहे. Concept of Happiness ही जरा तपासून पहावी. कारण मानवी जीवन अपूर्ण आहे. एक आहे तर एक नाही, असे असणारच कारण हे मानवी जीवनच तसे पाहता सुख दुःखाचे गाठोडे आहे.कारण हे सत्य पटले तरच आपल्याला जीवनातील उणिवांचे दुःख हलके करता येईल. उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करता येईल. वैज्ञानिक, विचारवंत आपले जीवन कसे सुखमय करतात.ते आपल्या नशिबाला कधीच दोष देत बसत नाहीत की हळहळ व्यक्त करत नाहीत..त्यांना पूर्णत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न अस्वस्थ करत असतो.पण तरीही ते दुःखामध्ये सुख शोधून आनंदी होतात. केवळ पदवी, पैसा, प्रतिष्ठा, भौतिक जीवनातली प्राप्ती संपूर्ण सुख किंवा सर्वसुख हे ज्यांच्याकडे आहे तोच खरा सुखी असतो असेही नाही.कारण दुःख हे कोणाच्याही वाट्याला येऊ शकते.म्हणून दुःख आल्यावर घाबरून जाण्यापेक्षा थोडा थंड दिमाखाने विचार करुन सुखप्राप्ती करुन घ्या.सुख तुमच्या जवळच गोंडा घोळत राहाते फक्त त्यापासून दूर न जाता त्या दुःखात दडलेले सुख शोधण्याचा प्रयत्न करा व आनंदी जीवन जगा.मानवी मनाची धाव सतत सुखासाठी धावपळ करत असते.पण सुख दूरच राहते.ते मृगजळाप्रमाणे भासत असते.चांगल्या विवेकी बुध्दीने विचार केल्यावर सुखी होता येते.. फक्त गरज आहे ती सकारात्मक राहण्याची व दुःखात लपलेलं सुख शोधण्याची...

# हरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी

हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक सतीश कौशिक यांचे गुरुवारी ह्रदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने एक हरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. सतीश कौशिक हे हिंदी चित्रपट सृष्टीतील एक नावाजलेले विनोदी अभिनेते होते. अनिल कपूर मुख्य भूमिकेत असलेल्या मिस्टर इंडिया या चित्रपटात त्यांनी केलेली कॅलेंडर नावाची विनोदी भूमीका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. जवळपास १०० हुन अधिक चित्रपटात त्यांनी केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या मनात घर करून गेल्या. प्रेक्षकांना हसवण्यासाठी ते कधी कॅलेंडर बनले तर कधी पप्पू पेजर, कधी जर्मन बनून तर कधी कुंजबिहारी बनून त्यांनी प्रेक्षकांना हसवले. राम लखन आणि साजन चले ससुराल या चित्रपटात त्यांनी केलेल्या विनोदी भूमिकांसाठी त्यांनी फिल्मफेअरचा उत्कृष्ट विनोदी अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. १३ जून १९५६ रोजी हरियाणातील एका खेडेगावात जन्मलेले सतीश कौशिक यांनी दिल्लीच्या किरोडीमल कॉलेजमधून उच्च शिक्षण घेतले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी हिंदी चित्रपटात काम करायचा निश्चय केला त्यासाठी अभिनयाचे शिक्षण घेण्यासाठी ते पुण्यात आले. पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये त्यांनी अभिनयाचे शिक्षण घेतले. अभिनयाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतल्यावर ते मुंबईत आले. मुंबईत आल्यावर त्यांनी काही नाटकात भूमिका केल्या. शेखर कपूर यांच्या मासुम या चित्रपटात छोटी भूमिका करून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. याच चित्रपटात शेखर कपूर यांनी त्यांना आपले सहाय्यक दिगदर्शक बनवले. या चित्रपटाचे ते सहाय्यक दिग्दर्शक होते. पुढे ते स्वतःच चित्रपटाचे दिग्दर्शन करू लागले. बोनी कपूर यांनी त्यांना त्यांच्या रूप की राणी चोरों का राजा या आपल्या बिग बजट चित्रपटासाठी दिग्दर्शनाची संधी दिली. सतीश कौशिक यांनी त्या संधीचे सोने केले आणि हिंदी चित्रपट सृष्टीतील नावाजलेले दिग्दर्शक म्हणून त्यांची ओळख बनली. त्यांनी दिगदर्शीत केलेले तेरे नाम, हम आपके दिल मे रहते है, हमारा दिल आपके पास है, बधाई हो बधाई हे चित्रपट खूप गाजले. त्यांनी काही चित्रपटांची निर्मितीही केली. सतीश कौशिक यांनी हिंदी सोबतच मराठी चित्रपटाचीही निर्मिती केली हे खूप कमी लोकांना माहीत आहे. त्यांनी मन उधाण वाऱ्याचे या मराठी चित्रपटाची निर्मिती केली. सतीश कौशिक हे असे अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते कारण जाण्याचे त्यांचे वय नव्हते त्यामुळेच त्यांच्या जाण्याने प्रेक्षक खूप हळहळले आहेत. सहाय्यक अभिनेते, विनोदी अभिनेते, निर्माते, दिगदर्शक अशा माध्यमातून हिंदी चित्रपट सृष्टीवर आपला वेगळा ठसा उमटवलेल्या सतीश कौशिक यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. हरहुन्नरी कलाकार सतीश कौशिक यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५



# पानसरे हायस्कूलमध्ये कॉपीमुक्तीची कडक अंमलबजावणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील हुतात्मा पानसरे येथे शाळेत दहावी बोर्ड परीक्षा सुरळीत चालू असतांना स्थानिक गटशिक्षण विभाग भरारी पथकाने धाड टाकून चौकशी केले असता एक ही विद्यार्थी कॉफी करताना आढळून आले नाही त्या धर्माबाद शिक्षण विभागाचे अधिकारी आर एम मरकंटे यांनी कौतुक केले आहे. दहावी बोर्ड परिक्षा २ मार्च २०१३ रोजी पासुन महाराष्ट्र भर सुरु झाली आहे. धर्माबाद तालुक्यात परिक्षा केंद्र अनेक आहेत पण पहिल्याच दिवशी मराठी पेपर होता तालुक्यात वेगवेगळे भरारी पथक फिरले पण पहील्याच दिवशी एक विद्यार्थी कॉफी करताना आढळून आला नाही विशेष. हुतात्मा पानसरे शाळेत प्रत्येक हॉल मध्ये २५ विद्यार्थी आहेत असे दहा हॉल मध्ये सुटेबल असे आसन क्षमताची व्यवस्था करण्यात आली. हुतात्मा पानसरे शाळेत एकूण ४९७ विद्यार्थी व विद्यार्थीनींचा समावेश आहे कर्तव्यदक्ष अधिकारी मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख असे कार्य करताना दिसुन आले. यावेळी सकाळी १०.३० वाजता परिक्षा केंद्रावर कॉफीमुक्त धोरण राबून विद्याथार्चे ओळख परेड हॉल तिकीट घेवून करण्यात आले व त्यांना पुष्पगुच्छ आणी चकलेट गोड पदार्थ देवून स्वागत करून पुढील परिक्षा कार्यास यशस्वी भव म्हणून गटशिक्षण अधिकारी मरकंटे सर व टीम पथकाने विद्याथार्चे मनोबल वाढविले आहे. प्रत्येक दहावी बोर्ड परिक्षा केंद्रावर भेटी दिल्या असुन कॉफीमुक्त धोरण केंद्रावर दिसून आले आहे. आज पहिल्या दिवशी एक ही विद्यार्थी कॉफी करताना आढळून आले नाही. त्यापैकी हुतात्मा पानसरे हायस्कूल, केंद्र संचालक एम व्ही पुलकंटवार मुख्याध्यापक बेबरेकर, कलर्क एस. टी. जाधव, भुसावळे सर व पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक पंतोजी पोलीस उपनिरीक्षक वाडेकर, सहायक उपनिरीक्षक नागूलवार, गुप्त संचार विभागाचे भालेराव, सहाय्यक उपनिरीक्षक आडे आदी कर्मचारी उपस्थित होते. हुतात्मा पानसरे हायस्कूलचे कौतुक होत आहे.





# शौचालयाचे बांधकाम तत्काळ थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** तालुक्यातील गौलखेड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील जागेला लागून सरकारी रोडलगत गौलखेड येथील राजेश प्रकाष रणीत या व्यक्तीने अवैधपणे अतीक्रमण करून त्या जागेवर शौचालयाचे बांधकाम सुरू केले असून ते तात्काळ थांबवण्यात यावे यासाठी सहा मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक, सरपंच यांचे कडे तक्रार केली असून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील जागेवर अवैधपणे बांधण्यात येत असलेले शौचालय हा महत्त्वाचा विषय असून ग्रामसेवक, सरपंच यांनी सदर तक्रारीला केराची टोपली दाखवत आजपावेतो कुठलीच कार्यवाही केली नाही, त्यामुळे सागर झनके यांनी संबंधित विषयाची तक्रार नहू मार्च रोजी बुलढाणा येथे जिल्हा प्ररिषदेच्या मुख्य कार्यकारी कधीकारी यांचेकडे केली आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील अवैधपणे होत असलेले शौचालयाचे बांधकाम तात्काळ थांबवून संबधीत व्यक्तीवर कार्यवाही करण्यात यावी, आणि भविष्यात त्या जागेवर कुठलेच अतीक्रमण करणार नाही असे तक्रारीत म्हटले आहे. एवढा संवेदनशील मुद्दा असतांना दादुलगाव ग्रामपंचायतचे ग्रामसेवक अनिल अंबडकर हे आपल्या कामाप्रती किती जागरूक आहेत हेच या मधून दिसून येते.त्यांची आपल्या कर्तव्याप्रती असंवेदनशीलता याठीकाणी प्रकर्षाने दिसून येते.सदर घटणास्थळाला अद्याप त्यांनी कार्यवाही तर दूरच साधी भेटही दिली नाही. त्यामुळे नंक्कीच कुठतरी पाणी मूरत आहे. एक हूशार, अभ्यासू ग्रामसेवक म्हणून त्यांची तालूक्यात ख्याती आहे.प्रत्येक काम ते नियमाच्या अधीन राहूनच करतात.आपल्या कामाप्रती ईमाणदार असलेले ग्रामसेवक अनिल अंबडकर या प्रकरणात मात्र चालढकल करताना दिसत आहे.

# पंढरपुरात शिवसेनेचे अनोखे आंदोलन; गाजर वाटप करत अर्थसंकल्पाची खिल्ली

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** आज राज्याचा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर करण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांनी हा अर्थसंकल्प मांडला. आता त्या अर्थसंकल्पाविषयी विविध संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. याच अर्थसंकल्पाचा विरोध करत आज पंढरपूर येथे शिवाजी चौक शिवसेना युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांच्या वतिने गाजर वाटप आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना शिवसेना युवासेनेचे युवा नेते रणजित बागल म्हणाले की, आजचा हा अर्थ संकल्प म्हणजे निव्वळ शेतकरी, युवक, महिला, व्यापारी, उद्यो जक यांच्या तोंडाला पाने पुसणारा अर्थसंकल्प आहे, या अर्थसंकल्पात मोठे मोठे आकडे दाखवुन कांदा उत्पादक शेतकरी व फळे भाजीपाला उत्पादक शेतकरी यांची झालेली दुर्दशा झाकून टाकण्याचा हा केविलवाणा प्रकार या सरकारकडुन सुरू आहे, याचाच प्रतिकात्मक विरोध म्हणुन हे गाजर वाटप आंदोलन करत आहोत. असे बागल म्हणाले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख रवींद्र मुळे म्हणाले की, या अर्थसंकल्पातून दक्षिण काशी असलेल्या पंढरपूर ला कोणत्याही प्रकारचे विशेष असे काहीच मिळाले नाही, वारीला आशिर्वाद मागणाऱ्या नेत्यांनी देवभुमीला सुध्दा वार्यावर सोडले आहे, याचा निषेध करतो.

यावेळी बोलताना तालुकाप्रमुख संजय घोडके यांनी सरकारवर जोरदार ताशेरे ओढत हे सरकार चुकीच्या वृत्तीचे आहे ते शेतकरी व गोरगरिबांच्या उपयोगाचे नाही अशा सरकारला येत्या काळात जनता धडा शिकवेल अशी भुमिका मांडली. या अनोख्या आंदोलनाची चर्चा आज पंढरपूर शहरभर पसरली होती, रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांना गाजर देत शिवसैनिक पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत अर्थसंकल्पाची जोरदार खिल्ली उडवली. यावेळी शिवसेना जिल्हाउपप्रमुख सुधीर अभंगराव व युवासेना शहरप्रमुख श्रीनिवास उंपळकर यांच्यासह लंकेश बुराडे, बंडु घोडके, विजय वनारे, तानाजी मोरे, अविनाश वाळके, उमेश काळे, प्रणित पवार, उत्तम कराळे, स्वप्निल गावडे, गौसपाक आत्तार, पप्पू तांबोळी, महेश कांबळे, सुरज कांबळे, संजय पवार, बालाजी कोळी, कल्याण कदम, विशाल डोंगरे, बळीराम देवकाते, शिवाजी कोष्टी, समाधान जगदाळे, पिंटु गायकवाड, बाळासाहेब पवार आदी कार्यकर्त्यांसह महिला आघाडीच्या संगितताई पवार, मंजुळाताई धोंडमिसे, शरिफा पठाण आदी उपस्थित होत्या.

# तलाठीबाई, कोतवाल लाचलुचपत विभागाच्या जाळयात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील भारंबा येथील तलाठी दीपाली योगेश बागुल व कोतवाल शेख हारुण शेख छोटू यांना तीस हजारांची लाच घेताना लाच प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. तक्रारदाराची तालुक्यातील मौजे भारंबा शिवारातील वडिलोपार्जित जमीन असून ती तक्रारदार व इतर दोघां भावांचे नावे फेरफार नोंद करायची होती. तलाठी बागुल यांच्याकडून त्यास टाळाटाळ केली जात होती. संबंधित तक्रारदार यांच्याकडे लाच मागण्यात आली. तडजोडअंती तीस हजार रुपये देण्याचे ठरले मात्र लाच देण्याची इच्छा नसल्याने लाच प्रतिबंधक





विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. या विभागाने सापळा रचला होता. पंचासमक्ष ३० हजार लाचेची मागणी करून ती रक्कम स्वीकारताना तलाठी व कोतवाल यांना पकडण्यात आले. कारवाई सापळा अधिकारी पोलिस निरीक्षक एस. एस. शेख, पोलिस अंमलदार, गणेश चेके, जावेद शेख, गणेश बुजाडे, गजानन कांबळे यांनी केली.

# परीक्षा हॉलमध्येच शिक्षकाचा मृत्यू


आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यतील सिन्नर शहरात परीक्षा केंद्रावर धक्कादायक घटना घडली आहे. पेपर सुरु होण्यापूर्वी तयारी सुरु असताना अचानक पर्यवेक्षण करणाऱ्या शिक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले आहे. यामुळे शाळा परिसरासह मित्र परिवार आणि कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. महात्मा फुले विद्यालयात शिक्षक किरण भास्कर गवळी हे पर्यवेक्षणासाठी होते. नियोजन सुरु असताना अचानक गवळी याना हृदय विकाराचा झटका आला. ते चक्कर येऊन बेशुद्ध पडल्याने शिक्षकांनी त्यांना शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# पंढरपूर- मंगळवेढा तालुक्यातील रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी 71 कोटी 10 लाख निधी

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील



विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या मजबुती व सुधारणा करणे कामांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस व अर्थ राज्यमंत्री दीपक केसरकर यांच्या माध्यमातून पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील रस्त्यांसाठी 71 कोटी 10 लाख रुपये निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

सदर रस्त्यांच्या आजूबाजूला वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या प्रवास मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी हे रस्ते सुधारित करण्यात यावेत यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी संबंधित विभागाकडे या रस्त्यांसाठी आर्थिक तरतूद करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती. आमदार आवताडे यांनी केलेल्या या मागणीची राज्य पातळीवर दाखल घेऊन हा निधी मंजूर झाल्याने या रस्त्यांचा कायापालट होण्यास खूप मोठी झाली आहे. पंढरपूर - मंगळवेढा तालुक्यातील मंजूर असलेले रस्ते - कागष्ट ते हुलजंती रस्ता मध्ये सुधारणा करणे, खर्डी ते तपकिरी ( शे ) रस्ता सुधारणा करणे, गुंजेगाव ते लक्ष्मी दहिवडी रस्ता सुधारणा करणे, माचणूर ते रहाटेवाडी रस्ता सुधारणा करणे, बोराळे ते मंगळवेढा रस्ता सुधारणा करणे, बाजीराव विहीर - गादेगाव - कोर्टी - बोहाळी - खर्डी - तनाळी रस्ता सुधारणा करणे, आंधळगाव ते पाटखळ रस्ता सुधारणा करणे, खर्डी - तावशी - एकलासपूर रस्ता सुधारणा करणे, भालेवाडी - डोणज - नंदुर रस्ता सुधारणा करणे, भोसे - रड्डे - निंबोणी - मरवडे रस्ता सुधारणा करणे, हाजापूर - जुनोनी - हिवरगाव ते तळसंगी रस्ता सुधारणा करणे, कासेगाव ते तावशी रस्ता सुधारणा करणे, ब्रह्मपुरी - मुंढेवाडी - भालेवाडी रस्ता सुधारणा करणे, कासेगाव ते टाकळी विसावा रस्ता सुधारणा करणे, जालिहाळ ते भाळवणी रस्ता सुधारणा करणे, कासेगाव ते तपकिरी शेटफळ रस्ता दुरुस्ती करणे, बठाण ते साखर कारखाना रस्ता सुधारणा करणे, तनाळी ते शेटफळ रस्ता सुधारणा करणे, हुलजंती ते सलगर खु - सलगर बु - उमदी रस्ता दुरुस्ती करणे, उपरी ते गादेगाव रस्ता सुधारणा करणे, लक्ष्मी दहिवडी ते प्रामा रस्ता सुधारणा करणे, कोर्टी ते माळीवस्ती रस्ता सुधारणा, हिवरगाव ते भाळवणी रस्ता सुधारणा करणे, कौठाळी चौफाळ ते धुमाळ वस्ती रस्ता सुधारणा करणे, लेंडवे चिंचाळे ते आंधळगाव रस्ता सुधारणा करणे, सलगर बु ते भुयार रस्ता सुधारणा करणे, तांडोर ते प्रतिमा रस्ता सुधारणा करणे, नंदुर ते बोराळे रस्ता सुधारणा करणे, येळगी ते प्रामा रस्ता सुधारणा करणे, मरवडे ते कालिबाग वस्ती रस्ता सुधारणा करणे, नंदेश्वर ते शिरसी रस्ता सुधारणा करणे, भोसे ते शिरनांदगी रस्ता सुधारणा करणे, खोमनाळ ते फटेवाडी रस्ता सुधारणा करणे, हुलजंती ते येळगी रस्ता सुधारणा करणे, चिक्कलगी ते येळगी रस्ता सुधारणा करणे, डोंगरगाव ते खोमनाळ रस्ता सुधारणा करणे, भागवत माने वस्ती ते मारापूर रस्ता सुधारणा करणे.



# स्पंदन हॉस्पिटलकडून आशा सन्मान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सांगोला यांचे कडून महिला दिनाच्या औचित्य साधून आरोग्य क्षेत्रामध्ये तळागाळात काम करणाऱ्या व प्रत्येकाचे घर न घर पिंजून काढणाऱ्या अशा वर्कर यांचा सन्मान सोहळा महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे संपन्न झाला. यावेळी नियत क्षेत्र अधिकारी वन विभाग व ॲथलेटिक्स वनिता इंगोले यांच्या शुभहस्ते आशा वर्कर्स यांना सन्मानपत्र ,शाल , श्रीफळ व छोटीशी भेट या गोष्टी देऊन आशा वर्कर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. मेघना देवकते डॉ. बालरोग तज्ञ डॉ. संगीता पिसे व डॉ. जयश्री बोरोडे उपस्थित होत्या.यावेळी बोलताना वनविभागाच्या अधिकारी वनिता इंगोले म्हणाल्या शासनाच्या वेगवेगळे योजना तळागाळातल्या जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम आशा वर्कर यांची आहे. दिवस, रात्र ,पाऊस ऊन, वारा कशाची तमा न बाळगता अविरतपणे आपले काम चालू ठेवत असतात. त्यामुळे निश्चितच आशा वर्कर या सन्मानास पात्र आहेत त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले. त्याचवेळी प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. मेघना देवकते यांनी सांगितले की गरोदर महिला प्रसूतीपूर्व आमच्या ट्रीटमेंट पेक्षा आशा वर्कर यांच्या देखरेखी खाली जास्त असतात.प्रत्येक आशा वर्कर यांना त्या महिलेची आरोग्य संबंधित छोट्यात छोटी गोष्ट माहित असते.काही महिला काही गोष्टीं आम्हाला सांगण्यास घाबरत असतात त्या गोष्टी आशा यांच्या माध्यमातून आम्हाला कळतात, हे त्यांचं कामाच्या प्रती असणार समर्पण आहे, निष्ठा आहे. असे बोलून त्यांनी आशा वर्कर यांच्या कार्याला सलाम केला. याचवेळी प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. संगीता पिसे म्हणाल्या आपल्याकडे तरी परिस्थिती बरी आहे परंतु आदिवासी भागामध्ये डोंगरदऱ्यांमध्ये अशा वर्कर आपल्या पाठीवर सर्व कामाचे दप्तर वागवत एका एका पेशंटच्या दारात जाऊन पोहोचतात व त्यांना आरोग्य विषयीची सर्व माहिती देतात व त्यांच्या नोंदी ठेवतात हे काम अतिशय कठीण आणि जोखमीचे आहे. त्यांच्या कामाचे मोजमाप करता येणे अशक्य आहे, आणि आज या महिलादिनी त्यांचा गौरव करण्याचे पुण्य मला मिळत आहे त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

# ५ लाखांचा गंडा घालण्यात भामटे यशस्वी

## २० वर्ष जीवन विम्यामध्ये व पोस्टात गुंतवली होती रक्कम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डिमॅट अकाऊंट मधे पैशे भरतांना वाळूज च्या किराणा व्यापाऱ्याला ५लाख १६ रु.चा गंडा सायबर भामट्याने घातला. या प्रकरणी वाळूज पोलिस ठाण्यात तीन महिन्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. दिनेश हिरालाल अग्रवाल (४५) धंदा व्यापार रा.वाळूज असे फिर्यादीचे नाव आहे. अग्रवाल यांनी जानेवारी २०२३ मधे शेअर ट्रेडिंग चे ऑनलाईन क्लासेस केले.पण शेअर मार्केटमधे काम करण्यासाठी डिमेट अकाऊंट हवे असते त्यानुसार अग्रवाल यांनी झिरोडा समूहाचे डिमेट अकाऊंट उघडले गुगलवर जाऊन झिरोडा समूहात ५हजार रु.जमा केले पैसे खात्यावर जमा झाल्यावर ऑनलाईन दिसण्यासाठी वेळ लागतो पण अग्रवाल यानी त्वरीत गुगल सर्च करतं जाऊन झिरोडा समूहाचा नंबर शोधला व फोन करुन विचारले असता.सायबर भामट्याने आपण झिरोडा मधूनच बोलंत आहोत असे सांगून अग्रवाल यांच्या खात्याचे डिटेल विचारले. अग्रवाल यांनी ताबडतोब सर्व माहिती दिली. सायबर भामट्याने दहा ट्रांझॅक्शन मधे अग्रवाल यांचे खाते रिकामे केले. हा प्रकार बँकेने अग्रवाल यांना निदर्शनास आणून दिला त्यावेळी सायबर भामट्यांनी हडपलेल्या रिकामे पैकी ९८ हजार रु. सीझ करण्यात बँकेला यश मिळाले त्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली.पण सायबर पोलिसांकडे येण्यास फिर्यादीला उशीर झाला होता पण त्यांनी तक्रार घेत दोन महिन्यांनी वाळूज पोलिसांकडे सोपवला. वाळूज पोलिसांचा सायबर विभाग नव्याने तपास करत आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक सचिन इंगोले यांनी दिली.

# व्यापाऱ्यांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**घोटी :** येथील प्रसिद्ध तांदूळ व्यापाऱ्यास नफ्याचे आमिष दाखवून बोरिवली येथील दोघांनी 38 लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. याबाबत घोटी पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदविण्यात आली आहे.

पद्धतीने द्राक्ष हंगामात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे प्रकार घडतात. असाच प्रकार घोटी येथील व्यापारी लक्ष्मण काळे यांच्यासोबत घडला आहे. परदेशात धान्याचे भाव वाढले आहेत. त्यामुळे तांदूळ, मैदा आदी साहित्य निर्यात केल्यास नफा होईल, असे आमिष दाखवून 38 लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. लक्ष्मण काळे यांनी घोटी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. काळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार बोरिवली येथील जयेश भरत बर्मन व भरत बर्मन यांनी काळे यांना दक्षिण आफ्रिकेत व परदेशात तांदळाचे भाव वाढले आहेत. तुम्ही निर्यात केली तर चांगली किंमत मिळू शकेल. तुमचा तांदूळ निर्यात करण्यासाठी आम्ही मदत करू, असे वेळोवेळी सांगून त्यांचा विश्वास संपादन केला.

# वाटुर सोसायटीच्या चेअरमनपदी संभाजी वारे

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** तालुक्यातील राजकीय दृष्टीने महत्वाच्या अशा वाटुर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी संभाजी अप्पा वारे यांची तर व्हाइस चेअरमनपदी सुमनबाई सोनवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

वाटुर येथील विकास सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक सहाय्यक निबंधक कार्यालयात घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अधिकारी बारगजे होते. चेअरमन पदासाठी संभाजी अप्पा गणपतराव वारे व व्हाईस चेअरमन पदासाठी सुमनबाई यांचे प्रत्येकी एक अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी बारगजे यांनी संभाजी वारे याची चेअरमनपदी तर व्हाईस चेअरमनपदी सुमनबाई सोनवणे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.यावेळी नवनिर्वाचित संचालक वायाळ गणेश नारायणराव, शेंडगे साईनाथ तात्याराव, हजारे मदनराव रामराव, भगस रामराव शिवाजीराव, पुष्पा विक्रम माने, मरळ जनार्दन अण्णासाहेब,बागल अरुणराव माणिकराव,वायाळ मालनबाई रामराव, आढे माणिक शिवाजीराव, केशरखाने विलास आश्रोबा, उजगीरे नामदेव दामोदर, आदींसह विक्रम नाना माने, सयाजी अण्णा भगस, बद्रीभाऊ खवणे, गणपत आबा वारे पुरुषोत्तम वायाळ सर, विलास आप्पा केशरखाने, उद्धव नाना वायाळ, बाळासाहेब अंभिरे राजू शेठ सय्यद, रामजी मरळ (सरपंच यदलापूर), डॉ गजानन केशरखाणे, राजू दादा वायाळ, माधव भैया जनकवार, लक्ष्मण नाना शिंदे, दिगंबरराव बागल, मदन भाऊ हजारे, साईनाथ भाऊ शेंडगे, माणिक आढे, प्रकाश दादा वायाळ, रामदास माने मारुती माने, गणेश नाना वायाळ, गणेश भाऊ सोनवणे, जगदीश भैय्या पडुळकर, राजू नाना माने, सचिन भैय्या खांडेभराड, तारेश उजगीरे यांनी नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन केले.






# सोनी कानडे टीचर इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** सर फाऊंडेशन या फाउंडेशन्या वतीने राष्ट्रीय स्तरावर दिला जाणारा उपक्रमशील शिक्षक पुरस्कार माळशिरस येथील जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळा माळशिरस मधिल उपक्रमशील शिक्षिका सोनी कानडे यांना प्रदान करण्यात आला .सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूट येथे आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन कानडे यांना सन्मानित करण्यात आले.

सिंहगड कॉलेज सोलापूर येथे नुकतीच भारतातील उपक्रमशील शिक्षकांची कार्यशाळा सर फाऊंडेशनच्या माध्यमातून घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये शिक्षकांनी आपल्या शाळेमध्ये राबवलेले उपक्रम सादर करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळा माळशिरस येथील उपक्रमशील शिक्षिका सोनी कानडे यांचा 'प्राथमिक स्तरावर कौशल्य भारत' हा उपक्रम निवडला गेला. त्यांना राष्ट्रीय स्तरावर दिला जाणारा उपक्रमशील शिक्षिका हा पुरस्कार माजी शिक्षणाधिकारी व माजी उपसंचालक श्री प्रदीप मोरे, सिंहगड इन्स्टिट्यूटचे संस्थापक संजय नवले, वाबळेवाडी शाळेचे आदर्श मुख्याध्यापक श्री वारे सर, इंदौरचे भावेश, बाळासाहेब वाघ, हेमा वाघ सिद्धराम माशाळे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे पती शिवलिंग गुमे, गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, प्राचार्य रामचंद्र कोरडे डायट वेळापूर, विस्ताराधिकारी प्रदीप करडे, हर्षवर्धन नाचणे , सायरा मुलाणी, केंद्रप्रमुख राजाराम गुजर , प्रकाश कांबळे, माजी केंद्रप्रमुख सुधीर नाचणे ,सर फाउंडेशन माळशिरस टीम उपक्रमशील शिक्षक नागनाथ घाटुळे तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनी व पालक वर्ग इत्यादींनी अभिनंदन व कौतुक केले.

# राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह असंख्य युवकांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश !

आधुनिक केसरी न्यूज

**तुळजापूर :** भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर प्रभावित होऊन व आपल्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून तुळजापूर शहरातील राष्ट्रवादीचे सक्रिय कार्यकर्ते आप्पासाहेब पवार यांच्यासह सचिन कदम, महेश पवार, गोपाळ पवार, सुदर्शन पवार, अजिंक्य नवले, परिक्षित साळुंखे, सौरभ पवार, करण देशमुख, सुनील इंगळे, आकाश पवार, गणेश पवार, नागेश पवार, सूर्या कदम, रवी पवार, अण्णा इंगळे, दादा इंगळे, विलास मोठे, महेश महाराज पवार, अक्षय पवार, अभिषेक पवार, योगेश माळी, अजित पवार, किशन इंगळे, सोमनाथ पवार, श्याम इंगळे, आप्पा गायकवाड, रमेश घाडगे, सुमित पारवे, ओंकार पवार, भागवत बेरड, बापू पवार, अविनाश पवार, सागर इंगळे, कृष्णा इंगळे, किरण गवते, सुरज रसाळ, शुभम रसाळ, सनी रसाळ, बिट्टु रसाळ यांनीही भारतीय जनता पार्टीत जाहिर प्रवेश केला. आराधवाडी, तुळजापूर येथे संपन्न झालेल्या या पक्ष प्रवेश कार्यक्रमात सर्वांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी युवा नेते विनोद गंगणे, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, नरेश अमृतराव, औदुंबर कदम, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद कंदले, युवा मोर्चा शहराध्यक्ष राजेश्वर कदम, अभिजीत कदम, संतोष पवार, सुहास साळुंके, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.




# बंजारा समाजबांधवांसोबत कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांचे धूलिवंदन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरातील कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दि.८/३/२३ रोजी दरवर्षीप्रमाणे सोयगाव तालुक्यातील बंजारा समाज बांधवांसोबत होळी - रंगपंचमी सण साजरा केला.गेल्या 20 - 25 वर्षांपासून मंत्री अब्दुल सत्तार सोयगाव तालुक्यातील वाडी, तांड्यात पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या होळीच्या कार्यक्रमात सहभागी होतात. याही वर्षी ना. अब्दुल सत्तार येथील होळी निमित्त आयोजित विविध कार्यक्रमात सहभागी होऊन तसेच सोयगाव येथील मित्र जनांच्या घरी सदिच्छा भेटी देऊन मंत्री अब्दुल सत्तार यांनी होळी - रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या.मंत्री अब्दुल सत्तार दरवर्षी होळी सणात सहभागी होत असल्याने येथील आबालवृद्ध देखील त्यांची आवर्जून वाट पाहतात. विविध गावात मंत्री अब्दुल सत्तार यांचे आगमन होताच या भागातील नागरिकांचा उत्साह द्विगुणित झाला. काही ठिकाणी औक्षण करून तर बऱ्याच ठिकाणी वाजत गाजत मंत्री अब्दुल सत्तार यांचे स्वागत करण्यात आले.सोयगाव तालुक्यातील वाडी, तांड्यात बंजारा समाज बांधव मोठ्या संख्येने राहतात. त्यामुळे येथील होळी सणाला पारंपरिक व प्राचिन प्रथा आहे. होळी निमित्त हातात हलगी घेवून पारंपरिक बंजारा गीतांवर पुरुष तसेच महिला भगिनींकडून नृत्य सादर केले जाते. हा देखावा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी होती.यावेळी ना. अब्दुल सत्तार यांच्या समवेत जि.म.सह. बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन गाढे, सोयगांव तालुका प्रमुख प्रभाकरराव काळे, मा. सभापती धरमसिंग चव्हाण, शहर प्रमुख संतोष बोडखे, अक्षय काळे, लतीफ शहा, भगवान वारंगणे, राजू दुतोंडे, राजेंद्र घनघाव, दिलीप देसाई, कदीर शहा, भगवान जोहरे, बाबू चव्हाण, दारासिंग चव्हाण, सिराज पठाण, देविदास राठोड, भरत राठोड, सांडू राठोड, मखराम राठोड, गजानन राठोड, यशवंत जाधव,श्रीराम पाटील, समाधान तायडे, ध्रुपताबाई सोनवणे, शेख पाशु, वसंत राठोड, श्रावण चव्हाण, हिरा चव्हाण, श्रावण जाधव, राधेश्याम जाधव, कृपालसिंग बातळे, अनिल लोखंडे, सुरेश चव्हाण, भागचंद चव्हाण, पंडित राठोड, कन्हीराम जाधव, गुलाबसिंग टेलर, शेख बबलू आदी शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.अशी माहिती जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.



# कृष्णा नदीत मृत माशांचा खच

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** कृष्णा नदीमध्ये दुषित पाण्यामुळे कोल्हापूर मार्गावरील अंकली येथे हजारो मासे मृत्यूमुखी पडले असून मृत मासे गोळा करण्यासाठी शुक्रवारी नागरिकांची झुंबड उडाली होती. कोल्हापूर मार्गावर सांगली शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर कृष्णा नदीचे पात्र आहे. हरिपूर येथे वारणा नदीचा संगम झाल्यानंतर हे ठिकाण असून आज सकाळी नदीकाठाला मृत मासे येत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. नदीपात्रामध्ये मृत माशांचा खच पडला होता. मृत माशे झुंडीने काठाला येत असल्याचे दिसून आले. यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

कृष्णा नदीपात्रात गेल्या काही दिवसापासून औद्योगिक वसाहत, साखर कारखान्यातून मळी मिश्रित पाणी विना प्रक्रिया सोडले जात असल्यामुळे आणि नदीतील वाहते पाणी कमी झाल्यामुळे नदीतील जलचर संकटात आले आहे. नदीतील पाणी प्रदुषित झाल्याने मासे मृत होत असल्याचे सांगितले जात आहे.

मृत मासे गोळा करण्यासाठी अंकलीच्या कृष्णा नदी येथे नागरिकांची झुंबड उडाली आहे, लहान माशापासून आठ-दहा किलो वजनाचे मासे देखील या ठिकाणी आता मृत झाल्याचे आढळून आले. मोठे मासे आढळल्याने खव्वयांनी मासे गोळा करण्यासाठी गर्दी केली होती. दरम्यान, सांगलीतील प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी नवनाथ अवताडे यांना याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले, की नदी प्रदुषित होण्यामागील कारणांचा शोध घेण्यात येत आहे. अंकली पूलाजवळील व सांगलीमध्ये शेरी नाला ज्या ठिकाणी नदीला मिळतो त्या ठिकाणच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून पाणी प्रदुषण होण्यामागील निश्चित कारण येत्या एक दोन दिवसात स्पष्ट होणार आहे. यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. दरम्यान, अंकली पूलाजवळ काही मृत माशेही मत्स्यविकास मंडळाच्या अधिकाऱ्याकडून ताब्यात घेण्यात आले असून मासे मृत होण्यामागील कारण या तपासणीतून स्पष्ट होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# डॉ. गिंडे यांच्याकडून शिष्य परंपरेची निर्मिती

## डॉ. गो. ब. देगलूरकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** कोणत्याही फळाची अपेक्षा न करता केशवजींनी मोठी शिष्य परंपरा निर्माण केली आहे. या कार्यक्रमातून वेणू वाजविला गोविंदे' ही भावना निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन मुर्ती शास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी केले.

पं. गिंडे यांच्या सहस्रचंद्र दर्शनानिमित्ताने एरंडवणा येथील कर्नाटक हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या वेणूगंधर्व संगीत महोत्सवाची सांगता झाली. यानिमित्ताने पं. डॉ. गिंडे यांचे शिष्य शशिकांत लिखित पं. डॉ. केशव गिंडे यांचे जीवन चरित्र 'वेणूगंधर्व' पुस्तकाचे प्रकाशन मुर्ती शास्त्राचे अभ्यासाक डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'पुस्तक तुला' करण्यात आली. त्यावेळी डॉ. गिंडे बोलत होते.

कार्यक्रमप्रसंगी डॉ. गिंडे यांच्या जीवनावरील गिरीश केमकर यांनी दिग्दर्शित केलेली 'नादब्रह्म' या चित्रफितीचे प्रकाशन करण्यात आले. पं. राजेंद्र कुलकर्णी यांना वेणुरत्न पुरस्कार यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमास उपस्थित राहून श्री पृ. प. विद्यानृसिंह भारती स्वामी करवीर पीठ शंकराचार्य यांनी आशीर्वाद दिले. शंकराचार्य म्हणाले की, पं. डॉ. गिंडे कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी आले त्यावेळी त्यांना पाहताच जेष्ठ बंधू भेटल्याची जाणीव झाली. ही व्यक्ती कलेने मोठी झालेला आहेच. परंतु इंजिनिअरिंग व गायन या दोन कला, शास्त्र एकत्र आले हे कौतुकास्पद आहे. त्यांनी अनेक प्रयोग केले आहेत आणि करत आहेत. भगवंताचे अधिष्ठान ठेवून त्यांनी आजपर्यंत कार्य केले आहे. डॉ. देगलुरकर म्हणाले की, फळाची अपेक्षा न करता केशवजींनी मोठी शिष्य परंपरा निर्माण केली आहे. या कार्यक्रमातून वेणू वाजविला गोविंदे' ही भावना निर्माण झाली. भौतिक समृद्धीमध्ये काही देश आपल्यापेक्षा जास्त पुढे आहे, परंतु आध्यात्मिक संस्कृतीत भारत पुढे आहे. आपली संस्कृती, संगीत आपण विकसित केले पाहिजेत. ते विकसित करण्यासाठी डॉ. गिंडे यांचे चरित्र वाचलेच पाहिजे. 'माझ्या आयुष्यातील हा सर्वात मोठा क्षण आहे. बासरीची केलेली सेवा पूर्णत्वाला आली. सर्वांचा मी ॠणी आहे,' अशा भावपूर्ण शब्दांत ज्येष्ठ बासरीवादक डॉ. पंडित केशव गिंडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

चिंचोरे म्हणाले, या व्यक्तिमत्वाची जगाला ओळख व्हावी म्हणून गेली अनेक वर्ष आपले आत्मचरित्र लिहा अशी अनेक वेळा वेग वेगळ्या पद्धतीने मागणी करूनही उपयोग झाला नाही. कारण काय तर तो भगवान श्रीकृष्ण माझेकडून सर्व काही करतो, माझे योगदान असे काहीही नाही. शेवटी त्यांना म्हणालो, आपले चरित्र मीच लिहितो. आपण आपला अद्भुत असा जीवन प्रवास क्रमाक्रमाने मला सांगा.

कार्यक्रमाचे निवेदन आनंद देशमुख यांनी केले. दोन दिवस चाललेल्या या वेणूगंधर्व संगीत महोत्सवात एकूण तीन सांगीतिक सत्रे झाली. प्रथम सत्रात बासरीवादक दिपक भानुसे, गायक पं. सुधाकर चव्हाण, बासरी वादक पं. नित्यानंद हळदीपूर, गायक पं. उदय भवाळकर यांचा बहारदार सादरीकरण केले. दुसऱ्या सत्रात डॉ. पं. केशव गिंडे आणि शिष्य 'कल्याण नवरंग सागर' या कार्यक्रमाने रसिक मुग्ध झाले, विदुषी मंजिरी आलेगावकर, बासरीवादक पं. राजेंद्र कुलकर्णी व्हायोलिनवादक पं. अतुलकुमार उपाध्ये यांची सांगीतिक जुगलबंदी रसिकांनी अनुभवली. तिसऱ्या सत्रात 'अमर बन्सी' हा प्रसिद्ध बासरी वादक अमर ओक आणि गायक पं. प्रसाद खापर्डे यांनी सादरीकरण केले. महोत्सवाची सांगता जेष्ठ बासरीवादक राजेंद्र प्रसन्ना यांच्या बासरीवादनाने झाली.

# पीरबावडा येथे शहामियाँ बाबा उरुसाला आजपासून प्रारंभ

## सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** ( ता.फुलंब्री )पिरबावडा व आडगाव खुर्द येथील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले शहामिया बाबा यांच्या उरुसास शनिवार दि.11 रोजी संदल मिरवणूक राहील. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहेत. रविवार दि.12 रोजी बारागाडे ओढण्यात येतील. सोमवार दि.13 रोजी कुस्त्यांचा आखाडा भरेल. यासाठी दहा रुपयापासून ते पाच हजार एक रुपयापर्यंत बक्षीस ठेवलेले आहेत. तसेच दि 13 रोजी आयोजक किशोर बलांडे यांच्याकडून कव्वाली चा मुकाबला ठेवण्यात आलेला आहे यात रेहाना चिस्ती,अस्लम नाझान यांचा रंगतदार मुकाबला होणार आहे. शहामियाँ बाबाच्या पायथ्याशी असलेल्या गावात आजही सर्वधर्मीय या ग्रामदैवताची आराधना करतात एका आख्यायिकेनुसार चौदाव्या शतकात पीरांची पालखी येथे वास्तव्यास आली. त्यांचा सत्संग संपल्यावर त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी डेरा टाकला त्या सर्व पिरांचे सरदार शहामिया बाबा होते त्यांनी परिसरात पिराचा बावडा





भरविला त्यांची आठवण म्हणुन बाबांच्या वस्तीला पिरबावडा असे नामकरण झाले शहामिया बाबा दर्गे समोर धनगर बाबा ची समाधी आहे. येथे प्रथम दर्शन झाल्यावर मग बाबांच्या तुर्बातीचे दर्शन घेतात. याठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायत व यात्रा कमिटी तर्फे करण्यात आली आहे. पीरबावडा गावाचे वैशिष्ट्य म्हणजे गावात चुना वापरत नाही किंवा घर बांधण्याकरता माती, विटांचा वापर केला जात नाही. जवळच असलेल्या आडगाव खुर्द या गावातही विटा मातीचे व चुना वापरुन घर काम केलं जात नाही इमारत बांधकाम करायचे असल्यास सिमेंट गट्टू किंवा ओतीव बांधकाम करण्यात येतेण. विशेष म्हणजे मार्च महिन्यातील संकष्टी चतुर्थीला बाबांचा संदल झाल्याशिवाय कोणतेही शुभ कार्य होत नाही. यात्रा संपताच विवाह चालू होतात.

# शोभा तांदळे व मनीषा देवकर पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** जिल्हा परिषद औरंगाबाद महिला व बालकल्याण विभागाच्या



वतीने दिला जाणारा आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार मिळवण्याचा मान वैजापूर तालुक्यातील फुलेवाडी अंगणवाडी केंद्राच्या सेविका शोभा संजय तांदळे व त्यांच्या मदतनीस मनीषा देवकर यांना मिळाला आहे. दोघींना वैजापूर तालुक्यातुन प्रथम आदर्श अंगणवाडी सेविका व मदतनीस म्हणून गौरविण्यात आले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात पार पडलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात दोघींना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, उपमुख्य अधिकारी प्रसाद मिरकले, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती भंडारी, सुदर्शन तुपे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी चंद्रकांत पाटील तसेच महिला व बालविकास विभागाच्या अधिकारी यांच्या हस्ते जिल्ह्यातील ८४ अंगणवाडी सेविकांना आदर्श पुरस्काराने गौरविण्यात आले. अंगणवाडी केंद्रातील नियमित कामकाज चोखपणे बजाऊन आदर्श घालून दिल्या बद्दल वैजापूर तालुक्यातुन फुलेवाडीच्या अंगणवाडी सेविका शोभा तांदळे तर त्यांच्या मदतनीस मनीषा श्रावण देवकर प्रथम पुरस्कार देत प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह देण्यात येऊन महिला दिनी सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्या बद्दल बालविकास प्रकल्प अधिकारी खडसे, विस्तार अधिकारी संतोष जाधव, पर्यवेक्षिका श्रीमती बडे, शोभा साळवे, आयटकच्या तालुकाध्यक्ष शालिनी पगारे, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी यांच्यासह तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी शुभेच्छा दिल्या.




आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर : अखिल भारतीय आदिवासी मन्नेवार समाज युवा मंचच्या वतीने आयोजित क्रिकेट प्रीमयर लीगमध्ये बालाजी बॉईज संघ चॅम्पियन ठरला. शौर्य इंडियन्स संघ उपविजेता ठरला. स्पर्धेत लक्षवेधी खेळी करणारा रोहन तंगडेल्लू मालिकावीर आणि संदीप घंटे सर्वोत्कृष्ट गोलंदाज पुरस्काराचा मानकरी ठरला.**

# छत्रपती संभाजीनगरमध्ये राज्यस्तरीय ओबीसी अधिवेशन

## अनेक विचारवंत, अभ्यासक, मान्यवरांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** भारतीय पिछडा ( ओबीसी ) शोषित संघटन, नई दिल्लीच्या वतीने महाराष्ट्र राज्य अधिवेशन दि.11 व 12 मार्च 2023 ( छत्रपती संभाजी नगर येथे हॉटेल आदर्श, दुय्यम निबंधक कार्यालयाच्या शेजारी, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी होणार आहे. सदर अधिवेशनाचे उद्‌घाटक म्हणून मा. खासदार इम्तियाज जलील, छत्रपती संभाजी नगर, स्वागताध्यक्ष डॉ. उज्ज्वलाताई दहिफळे, प्रमुख पाहुणे म्हणून मा.नामदार डॉ. भागवतजी कराड केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भारत सरकार , राष्ट्रीय अध्यक्ष एस जी माचनवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ज्ञानेश्वर गोरे, प्रकाश अण्णा शेंडगे, शांताराम बापू गाडेकर, भास्करराव आंबेकर, ॲड. गणपती मंडल, ॲड. मंगेश ससाने, डॉ. गजानन सानप, ॲड. मृणाल ढोले पाटील यांसह इतर अनेक मान्यवर नेते, विचारवंत, अभ्यासक, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. सदर अधिवेशनामध्ये ओबीसींच्या विविध विषयांवर अनेक परिसंवादाच्या माध्यमातून विचारमंथन होणार आहे.

उदघाटनाच्या नंतर दुसऱ्या सत्रांत ओबीसींसह सर्व जातींच्या जनगणनेची आवश्यकता - यावर अध्यक्षः सुशीलाताई मोराळे, ( ओबीसी नेत्या ) ॲड. बालाजी सगर किल्लारीकर, रमेश पिसे मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रात - मंडल पूर्व व मंडल पश्चात ओबीसी व भटके विमुक्त जाती जमातींची दशा व दिशा अध्यक्ष- सुनिता काळे, प्रा डॉ. कालिदास भांगे, ( सत्यशोधक अभ्यासक ) डॉ. शिवाजी हुसे, ( प्रसिद्ध साहित्यिक ) हे मार्गदर्शन करणार आहेत .सत्र चौथे -संघटनात्मक बांधणी विस्तार व नेतृत्व" यावर अध्यक्ष एस. जी.माचनवार, सत्यशोधक प्रबोधनकार अरविंद माळी, विलास काळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

१२ मार्च रोजी सकाळी पाचव्या सत्रात -"सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सव वर्ष आणि सत्यशोधक संस्कृतीची प्रासंगीकता :एक चिंतन"अध्यक्ष -सत्यशोधक विचारवंत प्रा सुदाम चिंचाणे, बालाजी थेटे, मायाताई गोरे, प्रा. डॉ नवनाथ गोरे , तर सहाव्या सत्रात नवीन शैक्षणिक धोरण 2020 :हित कुणाचे ? या विषयावर शिक्षणविषयाचे अभ्यासक प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड ,अध्यक्ष, तर शिक्षणतज्ज्ञ रमेश बीजेकर व सविताताई हजारे हे विचार मांडणार आहेत व या अशा महत्वपूर्ण विषयावर परिसंवाद होत आहेत. सर्व बंधुभगिनीनी सदर अधिवेशन यशस्वी करण्याकरिता सहकार्य करावे व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुदाम चिंचाणे, डॉ. कालिदास भांगे, डॉ वसंत हारकळ, डॉ. प्रभाकर गायकवाड, डॉ देवराज दराडे, डॉ. कृष्णा मालकर, शरद बोरसे,अमोल वाघमारे, डॉ. हनुमान वांकर, बळी चव्हाण, जनार्दन कापुरे, प्रा राजू पोपळघट, डॉ. विश्वनाथ कोक्कर, विठ्ठल नागरे,डॉ संजीव पांचाळ, रामकीशन मुंडे, आकाश मेहेत्रे आदींनी केले आहे.

# जांभाळा ग्रा.पं.वर पाण्यासाठी संतप्त महिलांचा हंडा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**जांभाळा :** ग्रामपंचायत वर पाण्यासाठी संतप्त महिलांचा हंडा मोर्चा काढण्यात आला. गंगापूर तालुक्यातील जांभाळा, पोटूळ, पेकलवाडी ग्रुप ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायत मध्ये पिण्याचे पाण्याचे आरो प्लान आहे त्याद्वारे अल्प शुल्क घेऊन पाणी वितरण करण्यात येते परंतु जवळपास एक महिन्यापासून आरो प्लान बंद असल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्या कारणाने दि ०९ गुरुवारी सकाळी गावातील पन्नास ते साठ महिलांनी ग्रामपंचायत कडे मोर्चा वळवला पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याची खेद व्यक्त केली. याच बरोबर सार्वजनिक नळांना सुद्धा वेळेवर पाणी पुरवठा नसल्याचे महिलांचे म्हणणे होते या समस्या कडे ग्रामसेवक, सरपंच लक्ष देत नसल्याचे महिलांनी सांगितले. उपसरपंच सचिन मंजुळ यांना ग्रामपंचायत च्या कोणत्याही कामाबद्दल माहिती व विश्वासात घेतले जात नसल्याचे त्यांनी सांगितले. आरो प्लान लवकर दुरुस्ती करून पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी महिलांनी केली आहे. यावेळी सचिन अशोक मंजुळ, उपसरपंच,सुरेखा दाणे, आसेफ शेख ग्राम पंचायत सदस्य,सुशिला गेलोद तंटा मुक्ती अध्यक्ष, इक्राम शेख,शफिक रशिद शेख, लताबाई दाणे, अर्चना भिमराव दाने , जिजाबाई मुरलीधर बनकर, बिजला बाई बनकर, वंदना दाणे, सफिया शेख,रजिया शेख, हिराबाई तावणे, पुजा पवार, नयना गेलोद, शिदुबाई सपकाळ, अमिना शेख, आदी महीला उपस्थित होत्या.



# विश्व हिंदू परिषद संपर्क कार्यालयाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नारायण बुवांची समाधी मंदीराचे मठाधिपती ह.भ.प. श्री . भाऊ महाराज रूद्र यांच्या प्रमुख उपस्थितीत लालबाग मारूती मंदीराच्या समोर श्री स्वामीनारायण मंदीराचे मठाधिपती संतश्री आनंदजीवनजी स्वामी यांच्या शुभ हस्ते हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती २०२३ या संपर्क कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला. विश्व हिंदू परिषदेतर्फे चैतन्यमय वातावरणात ९ मार्च रोजी सायंकाळी कार्यालयाचा शुभारंभ झाला .

यावेळी मठाधिपती पुज्यनिय संतश्री आनंदजीवनजी स्वामी यांनी उपस्थितांना संबोधित करतांना हिंदू नववर्ष स्वागत यात्रेसाठी शुभेच्छा देवून आशिर्वाद दिले .



हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती - २०२३ चे स्वागताध्यक्ष तथा नगरसेवक शितलकुमार नवले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून स्वागत यात्रेच्या पुढील नियोजनासाठी संपर्क कार्यालयात उद्देशाने हे कार्यालय उघडण्यात आले . सर्व हिंदुत्ववादी कार्यकत्यांना हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती व एकमेकांशी सहज संपर्क साधता यावा व या ठिकाणी एकत्र येऊन वैचारीक आणि नियोजनात्मक कल्पनांची देवाण घेवाण करण्यासाठी अस्थायी स्वरूपात भव्य संपर्क कार्यालय असेल,असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. सर्व हिंदू बांधवांनी नियमीत उपस्थित रहावे असे आवाहन केले . ह्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी धुळे मनपाच्या महापौर सौ. प्रतिभा चौधरी, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी महापौर प्रदीप कर्पे , राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह राजेश पाटील, भाजप अध्यक्ष अनुप अग्रवाल , विजय पाश्चापुरकर , संदीप अग्रवाल , महेश घुगरी, संजय बोरसे , हेमंत मराठे विहिंपचे राजेंद्र खंडेलवाल , विहिंप देवगिरी प्रांतचे कार्यकर्ते हेमंत देवळे , विहिंपचे जिल्हामंत्री विशाल पिंपळे , तसेच धुळे शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर , सर्व राजकीय व हिंदुत्ववादी संघटनांचे आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबट्याचा महिलेवर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील वायगाव येथे बिबट्याने एका महिलेवर हल्ला करून चक्क घरात ठिय्या मांडला. दरम्यान, बिबट्याला सात तासाच्या अथक परिश्रमानंतर बेशुध्दीकरणाचे इंजेक्शन देवून जेरबंद करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे. ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा बफर क्षेत्रातील गावात तसेच वनालगतचा गावामध्ये वन्यप्राणी-मानव संघर्ष तीव्र झाला आहे. वन्यप्राणी घरामध्ये शिरकाव करू लागले आहे. चंद्रपूर बफर वनपरिक्षेत्रातील मामला उपक्षेत्रात येणाऱ्या वायगांवात एका महिलेवर हल्ला करून बिबट्याने चक्क घरात ठिय्या मांडला. या घटनेची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल होवून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी हालचाली करण्यात आल्या. मात्र, बिबट जेरबंद झाला नाही. वनविभागाचे शीघ्र कृती दलाचे पथक व शूटर व डॉक्टरांनी बिबट्याला बेशुध्दीकरणाचे इंजेक्शन देवून जेरबंद केले. तब्बल सात तास रेस्क्यू ऑपरेशन राबविल्यानंतर बिबटला जेरबंद करण्यात यश आले. या घटनेनंतर गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.




# महिला दिनानिमित्त भाजपतर्फे महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालयात उपस्थित महिला डॉकटर, नर्स, आरोग्य कर्मचारी, कृषी कार्यालयातील महिला कर्मचारी,सहाय्यक निबंधक कार्यालय, यांचा भारतीय जनता पार्टी खुलताबाद तालुक्याच्या वतीने सत्कार करताना भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, नगरसेवक परसराम बारगळ,योगेश बारगळ, आशिष कुलकर्णी, यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर बोधनकर, डॉक्टर गायसमुद्रे, वैद्यकीय अधिकारी श्रीमती वाघ, श्रीमती पाषाण, श्रीमती राऊत,, श्रीमती कादरी, श्रीमती सुरवसे, श्रीमती दीक्षित, श्रीमती ढगे, श्रीमती कांताबाई, श्रीमती अलकाबाई, या उपस्थित महिला अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# जागतिक महिला दिनी महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगरच्या वतीने बाजार सावंगी, तालुका खुलताबाद विभागाच्या पर्यवेक्षिका शोभा कडूबा शिंदे यांना त्यांच्या नोकरी काळात वर्षभरात उत्कृष्ट कार्याबद्दल आदर्श पर्यवेक्षिका म्हणून जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या हस्ते काल बुधवारी राष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी महिलांचा गौरव म्हणून पुरस्काराने गौरविण्यात आले त्यांना पुरस्कार वितरण करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# वसुंधरेच्या संगोपनसाठी सामूहिक प्रतिज्ञा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दिवसेंदिवस वसुंधरे ची होत असलेली दुरावस्था व हानी बघता या वसुंधरेचे संवर्धन, संरक्षण, व संगोपन व्हावे या साठी शहरातील नागरिक, नगरसेवक, व अधिकारी यांनी एकत्र येऊन वसुंधरा संगोपनाची प्रतिज्ञा घेतली, त्यांना स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांनी शपथ दिली, झाडे लावणे झाडे जगविणे, स्वछता पाळणे,पाण्याची बचत,प्लास्टिक निर्मूलन,मातीची धूप थांबविणे व परिसर स्वच्छता राखणे याबाबत नागरिकांनी आपली भूमिका व कर्तव्य पार पाडावे असे आवाहन ही सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीराम ध राजपूत यांनी केले,या प्रसंगी नागराध्यक्ष शिल्पाताई परदेशी,मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत सह नगरसेवक,वैद्यकीय अधिकारी,कार्यालयीन अधिकारी ,कर्मचारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, शहरात स्वच्छ सर्वेक्षण२०२३ निमित्त स्वच्छता बाबत व प्लास्टिक वापरावर बंदी बाबत ही धोंडीसिंह राजपूत यांनी उपस्थित नागरिक, महिलांना मार्गदर्शन केले.





# 'आपुलकी'च्या वतीने भेटवस्तू देऊन महिला दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** जागतिक महिला दिनानिमित्त आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने पालावर राहणाऱ्या महिलांना गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन महिला दिन साजरा करण्यात आला. सांगोला येथील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. रोजी रोटी साठी भटकंती करत गावोगावी फिरत काबाड कष्ट करणाऱ्या कुटुंबातील महिलांना त्यांच्या राहत्या पालावर जाऊन गुलाब पुष्प व पाण्यासाठी स्टील कळशी भेटवस्तू देऊन जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. ज्यांना जागतिक महिला दिन म्हणजे काय? हेही माहित नाही, अशा महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्याबद्दल त्या महिलांनाही मोठा आनंद झाला. व त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, प्रमोदकाका दौंडे, महादेव दिवटे, दादा खडतरे आदी उपस्थित होते.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर. मो : 9422201977



# पैठण शहरातील नाल्यांची थातुरमातुर साफसफाई

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अवघ्या दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या नाथषष्टी सोहळ्यास राज्याच्या विविध ठिकाणाहुन वारकरी दाखल होतात, परंतु यात्रा काळात लाखो वारकऱ्यांना नगर परिषदच्या उदासीन कारभारामुळे नालेसफाई थातुरमातुर झाल्याने आलेल्या वारकऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागणार असल्याने बहुतेक ठिकाणी नालेसफाई थातुरमातुर झाल्याचे चित्र सध्या पैठण शहरात दिसते. यात्रा काळात शहरातील मुख्य नाले सुफाई करणे त्यापैकी कहारवाडा येथील मुख्य नाला, बस स्टॅन्ड मागील बाजू ( तहसील रोड ), सराफनगर व शशी विहार येथील मुख्य नाला नवीन कावसान येथील मुख्य नाला, धनगरवाडा सार्वजनिक शौचालय ते गोपाल नगर ते सिध्देश्वर रोडपर्यंत, कन्या शाळा, लहुजी नगर ते गागाभट्ट चौक ते गोदावरी पात्रापर्यंत, ग्रिन चौक ते मौलाना साहब दर्गापर्यंत, पंचायत समिती मागील नाला ते वखार महामंडळ ते उद्यान रोड पर्यंत, अशी नालेसफाई यात्रा काळात होत असते परंतु काही ठिकाणी थातुरमातुर नालेसफाई होत असल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.



# वर्ग मैत्रिणीस क्रीडा स्पर्धेसाठी केली आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा येथील विद्यासागर कन्या प्रशालेची आठवीत शिकणारी विद्यार्थिनी कृष्णाली ज्ञानेश्वर वेळांजकर हिची उंच उडी मध्ये राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली असून ही स्पर्धा बल्लारपूर जि. चंद्रपूर येथे दि.१० ते१२ मार्च दरम्यान होणार आहे. आज या प्रशालेतील विद्यार्थिनींनी आपल्या खाऊचे पैसे जमा करून कृष्णालीस प्रवास खर्चासाठी दिड हजार रुपयांची मदत केली व तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिंदे-फडणवीस सरकार शेतकऱ्यांविषयी असंवेदनशील

## शेतकऱ्याचे मनोधैर्य खचले : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नापिकी, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस या नैसर्गिक संकटाने राज्यातली शेती अडचणीत आली आहे. शेतमालाला मातीमोल दर मिळत असल्याने भाजीपाला, शेतमाल रस्त्यावर फेकण्याची वेळ राज्यातल्या बळीराजावर आली आहे. खतांच्या वाढलेल्या किंमती, बोगस बियाण्यांचा प्रश्न, घसरलेल्या 'सीबील'मुळे बँका कर्ज देत नाहीत, कृषीपंपाच्या वीज कनेक्शन तोडली जात आहे त्यामुळे राज्यातला शेतकरी मेटाकुटीला आला आहे,राज्यातला शेतकरी खचला आहे, त्यामुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली असून रोज आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत. मात्र शिंदे-फडणवीस सरकार शेतकऱ्यांविषयी अत्यंत असंवेदनशील असल्याचा घणाघात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज केला. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवत असताना सरकारने कृषी क्षेत्राला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. मात्र शिंदे-फडणवीस सरकार कृषी खात्यातल्या बदल्या, पदोन्नती आणि भरतीमध्ये अडकले आहे असा आरोपही अजित पवार यांनी केला.



वर्षभरापासून खतांच्या किमतीत सातत्याने वाढ होते आहे . त्यामुळे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे . खतांच्या किमती जोपर्यंत आटोक्यात येत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या हातात उत्पन्न येणार नाही . खतांच्या किंमती आटोक्यात ठेवण्यासाठी राज्य सरकारने केंद्रसरकारकडे मागणी केली पाहिजे . खत उत्पादक कंपन्या आणि ठोक खत विक्रेत्यांच्या सहमतीने रासायनिक खतांची लिंकिंग करून किरकोळ विक्रेत्यांसह शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार महाराष्ट्रात सुरु आहे . मागच्या हंगामात मागणी नसलेल्या नॅनो युरिया, कंपोस्ट, मायक्रो नुट्रीयंट, वॉटर सोलूबल खतांचे मुख्य खतांसोबत लिंकिंग करण्यात आले . ज्यांना मुख्य खत पाहिजेत त्यांनी ही बाकीची खतेही घेतली पाहिजे, असे बंधन घालण्यात आले . त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी पिळवणूक होत आहे . याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले .

राज्यात राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. शेतकऱ्यांचे 'सिबील' स्कोअर बिघडल्यामुळे त्यांना कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात बँकांनी कर्ज दिले नाही तर मग त्यांना नाईलाजाने सावकारांच्या दाराशी उभे रहावे लागते. ती कर्जफेड त्यांच्याकडून होत नाही आणि मग आत्महत्येपर्यंत शेतकरी पोहोचतो. हे मोठे दुष्टचक्र आहे. ते भेदण्यात सरकार अपयशी ठरत आहे असेही अजित पवार म्हणाले. पीक विम्याच्याबाबतीत अनेक तक्रारी आहेत. मागच्या वर्षी विदर्भ, मराठवाडा, पश्चिममहाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले पण विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना हक्काची नुकसानभरपाई मिळालेली नाही. विमा कंपन्यांबाबत तक्रारी वाढल्यानंतर आता शेतकऱ्यांना बदनाम करण्याचा कट काही लोकांनी आखला आहे. काही प्रमाणात बोगस विमा काढला जात असेल तर त्यांच्याविरुध्द जरुर कारवाई करा परंतु, सरसकट शेतकऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची आवश्यकता नाही असेही अजित पवार यांनी सरकारला खडसावले.

# पैठण येथे जिल्हास्तरीय हातमाग प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** येथील मराठी पैठणी साडी केंद्र येथे जिल्हा हातमाग प्रदर्शनाचे उद्‌घाटन पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल नेहुल, प्रमुख पाव्हुने पवन लोहीया, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष, तसेच मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्या उपस्थितीत हातमाग प्रदर्शन खुले करण्यात आले. पैठण केंद्रात शुक्रवारी हातमाग, तसेच पैठणी साडीच्या आनेक प्रकारच्या विणकाम केलेल्या साड्या,शोभिवंत वस्तू,तसेच ईतर राज्यातील साड्यांचे प्रदर्शन ईथे सहा दिवस चालणार आहे.यावेळी उपनिर्देशक जवाहरलाल कुंनसोठ विणकर सेवा केंद्र मुंबई, श्रीनिवास चन्ना, जयंत मंगलपल्ली, पैठणी मराठी केंद्राचे, सहव्यवस्थापक संजय कोटुरकर, जितेंद्र परदेशी यांची उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उत्सव समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीही स्टॅंडिंग येथील परिसरातील एकाच जागेवर डीजे लावून जयंती साजरी करण्यात येणार आहे. भिमनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंतीनिमित्त मा.नगरसेवक कार्य सम्राट जितुभाऊ शिरसाठ यांच्या अध्यक्षस्थानी मिटींग ची सुरवात करण्यात आली. तर जेष्ठ नागरीक लक्ष्मण जिरे, सुभाष वाघ, मोरे दादा, आयोजक प्रमुख-संजुभाऊ सरदार होते. तर भिमनगर जयंती उत्सव समित अध्यक्ष बीन विरोध एकमताने आयु.धनराज शिरसाठ यांची निवड करण्यात आली. तसेच उपअध्यक्ष-किरण धिवरे,सचिव-विनायक इंगळे, खजिनदार-निलेश जिरे, कार्यअध्यक्ष-संतोष मोरे यांची निवळ करण्यात आली. तरी सदस्य-म्हणून काम करणारे समस्त भिमनगर तरूण मित्र मंडळ असतील तर कार्यक्रमाची रूपरेषा सागर शिरसाठ यांनी आखली तर कार्यक्रम सूत्रसंचालन प्रकाश शिरसाठ यांनी केले. व सर्वांच्या उपस्थितीत जयंतीची रूपरेषा आखण्यात आली. या ठिकाणी माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांनी सांगितले की ही जयंती एका समाजाने साजरी करण्याचे नियोजन नसून सर्व समाजाचे हातभार लावून एकत्रित येऊन जयंती मोठ्या उत्साहात साजरी करायचे आहे.



# नाथषष्ठी महोत्सवात पैठणमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम

## मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देशातून भाविक दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण:** वारकरी संप्रदायातील दुसऱ्या क्रंमाकाची वारी म्हणुन श्रीक्षेत्र पैठण येथील एकनाथषष्ठी महोत्सव अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. संत एकनाथ महाराजांचा जलसमाधी दिन म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो.

त्यानिमीत्त श्रीक्षेत्र पैठण येथे ४२४ व्या श्री एकनाथ षष्ठी महोत्सव २०२३ ( ताः९ ) गुरवार रोजी पवित्र अशा राजंणाच्या पुजेने प्रारंभ झाला असून (ताः१५) बुधवार रोजी ४ः वा सुर्यास्ता समयी नाथमहाराज समाधी मंदीरात नाथवंशजाच्या हस्ते,तसेच संस्थानच्या वतीने मंदीराबाहेर काला दहीहंडी फोडून सागंता होणार आहे. श्रीएकनाथष्ठी हा दिवस महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर श्रीएकनाथ महाराज समाधी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. विशेषतः पैठणमध्ये सहा ते सात लाख भाविक ह्या सोहळ्यास उपस्थित असतात.पैठण येथील नाथषष्ठीची वारी वारकरी संप्रदायातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी वारी असून पंढरपुरच्या आषाढी वारी नंतर ह्या वारीस मोठया प्रमाणावर वारकरी समाज एकत्रित होतो. विविध ठिकाणांहून आलेल्या दिंडया, "भानुदास-एकनाथ" चा गजर हयामुळे संपूर्ण परिसर भक्ती रसात न्हाऊन निघतो. ( ताः१२ ) शुक्रवार पंचमीच्या दिवशी मानकऱ्यांना उत्सवाचे आमंत्रण दिले जाते. ( ताः१३ ) शनिवार रोजी षष्ठीच्या दिवशी पहाटे २ वाजता श्रीविजयी पांडुरंगाच्या मूर्तीस महाभिषेक करण्यात येतो. नाथवंशजांची मानाची पहिली दिंडी दुपारी १२ वाजेच्या सुमारास गावातील मंदिरातून श्रीएकनाथमहाराजांच्या समाधी मंदिराकडे प्रस्थान करते. मंदिरात नाथवंशजांच्या वतीनं वारकरी व हरिदासी कीर्तनं करण्यात येतात. गावातील मंदिरात परतल्यानंतर आरती होते. सोहळ्यासाठी आलेल्या सर्व दिंडया नगर प्रदक्षिणा करुन गोदाकाठी आपापल्या फडात/मठात विसावतात.

( ताः१४ ) रोजी सप्तमीच्या दिवशी रात्री १२ वाजता नाथांच्या पादुकांची गावातून मिरवणूक



काढण्यात येते. त्यास छबिना असे म्हणतात. पहाटेच्या सुमारास पालखी वाळवंटात आल्यानंतर पादुकांना गोदास्नान घालण्यात येते, भारुड सादर केली जातात. सकाळी ७ वाजेच्या सुमारास पालखी गावातील मंदिरात येते. वारकऱ्यांच्या फडांमध्ये भजन कीर्तनादींचे आयोजन करण्यात येते. वाळवंटात कीर्तन ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी जमते. (ताः१५) बुधवार अष्टमीच्या दिवशी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास गावातील नाथमंदिरातून काला दिंडी निघते. उदासीमठाजवळील पायऱ्यांवर पावल्या खेळण्यात येतात. हे दृश्य आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी हजारोंचा समुदाय येथे उपस्थित असतो. समाधी मंदिरात पोचल्यानंतर मंदिराच्या समोरील पटांगणावर टाळमृदुंगाच्या गजरात शेकडो भाविक पावल्या खेळण्यात तल्लिन होऊन जातात. मंदिराच्या बाजूस उंच ठिकाणी गुळ आणि लाह्या यांचे मोठेमोठे लाडू आकर्षकरित्या बांधण्यात येतात.

त्याच्या मध्यभागी काला भरलेली हंडी लटकविलेली असते. सूर्यास्तासमयी 'दत्तात्रय जनार्दन श्री एकनाथ' च्या जयघोषात नाथवंशजांकडून काठीच्या सहाय्यानं ती हंडी फोडण्यात येते. प्रसाद मिळविण्यासाठी भाविकांची झुंबड उडते. परंपरेचे अभंग, गौळणी, आरती झाल्यानंतर गोदावरीच्या वाळवंटात काला वाटण्यात येतो. या तीनही दिवसांमध्ये श्रीएकनाथमहाराजांच्या पैठणकर फडातील हजारो वारकरी दिंडीत सहभागी होत असतात. शिवाय इतरही दिंड्या आपआपल्या पध्दतीनं सोहळ्याचा आनंद लुटतात. सद्यस्थितीत पैठण येथे सोहळ्यास येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देश आदी ठिकाणांहून येणाऱ्या भाविकांच्या संख्येत वाढ होत आहे तसेच कोकण, मुंबई, कर्नाटक आदी परिसरातून दिंड्या घेवून येण्यासाठी भाविक उत्सूक असल्याने येथे वारकऱ्यांची नव्यानेच भर पडत आहे. नाथषष्ठी हा उत्सव विदेशी लोकांच्याही आकर्षणाचा विषय बनला असुन अनेक विदेशी पर्यटक सोहळा पाहण्यासाठी पैठणास येतात.

# सामंजस्याने बोडखा येथे वादावर पडला पडदा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** अनेक वर्षांपासून बोडखा (ताः खुलताबाद) येथील मराठा हिंदू व मुस्लिम समाज बांधवांसह अन्य समाजातील रहिवासी गुण्यागोविंदाने व सौख्याने इथे वास्तव्यास आहेत तालुका व गावच्या राजकारणासह सरपंच उपसरपंच तंटामुक्ती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व समाजाच्या व्यक्तींनी कसलाही संकोच धरता कार्यकाल या गावात पाहिलेला आहे.

मंगळवार (ताः७) उत्तर रात्री साडेबारा ते अडीचच्या दरम्यान कन्नड बोडखा बाजार सावंगी लोणी खुलताबाद या महत्त्वाच्या आंतर जिल्हा रस्त्यावरील चौफुलीवर अज्ञात व्यक्तीने हिरव्या रंगाचा झेंडा उभारून समाजा समाजात निर्माण करण्याचा केलेला प्रयत्न गुरुवारी (ताः९) सकाळी अकरा वाजेपर्यंत महसूल व पोलीस प्रशासनाचे अधिकारी बोडखा लोणी दोन्ही गावचे सरपंच उपसरपंच समाज प्रतिष्ठित नागरिक समाज बांधव पोलीस पाटील तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पंचक्रोशीतील पत्रकार यांनी एकत्र येऊन यापुढेही सौख्याचा रहिवास किती महत्त्वाचा आहे समाज गाव तालुका जिल्हा राज्य व देशाच्या विकासासाठी हम सब एक है हे कृती व वर्तणुकीत दाखवणे सर्वांसाठी सोयीचे आहे यातच आपल्या गावाचे भले आहे असे चर्चा अंति ठरल्याने ग्रामस्थ पोलीस व महसूल प्रशासनाने निश्वास सोडला सर्वांची खात्री झाल्याने व गावाच्या वातावरणातील शांतता सौख्य पाहून आर सी पी पथकासह प्रमुख वगळता अन्य सर्वच अधिकारी व पदाधिकारी यांनी बोडखा गाव सोडले. मंगळवारी रात्री अज्ञात व्यक्तीने हिरवा झेंडा उभारलेला पाहिल्यावर सकाळी तेथील रहिवासी दीपक वानखेडे यांनी बाजार सावंगी पोलीस चौकी येथे खबर दिल्यावरून जमादार दिलीप बनसोड व संजय सपकाळ यांना घटनास्थळी तात्काळ पाठवण्यात आले त्यांनी बोडखा सरपंच अशोक जाधव लोणी चे सरपंच गुलशनबी सत्ता र व सत्तार पटेल यांच्याशी चर्चा केली चर्चें अंती केशरी व हिरवा झेंडा काढून घेऊ असे सांगितले होते व ग्रामवासीयांशी चर्चा करू व झेंडे काढून टाकू असे ठरले असताना बुधवार रात्री थोडी समाजात पाहायला मिळाल्यावर

> या घटनेत 143 लोकांवर गुन्हे दाखल होणार होते त्यावरही ग्रामस्थांनी वरिष्ठांना माघारीची विनंती केली आहे तसेच दोघांना ताब्यात घेतलेले असताना चर्चेअंती त्यांचीही सुटका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे समन्वयाने शांतता निर्माण झाल्याने तेथील समाजातील वादळ शमले आहे दुपारनंतर बोडखा या गावी आर सी पी औरंगाबाद ग्रामीणचे श्री बनसोड व त्यांचे पथक शांतता अशीच नांदावी त्यासाठी तातुपरते त्या गावी वास्तव्यास राहणार आहे .

गुरुवारी ( ताः९ ) उपविभागीय पोलीस अधिकारी जनार्दन विधाते खुलताबाद तहसीलदार शैलेंद्र देशमुख पोलीस डी वाय एस पी मुकुंद आघाव तालुका पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे आर सीपी औरंगाबाद ग्रामीणचे ए एस आय त्र्यंबक बनसोड व त्यांचे पथक मुख्य जमादार नवनाथ कोल्हे व त्यांचे पथक पी एस आय विजयकुमार वाघ बोडखा व लोणीचे तलाठी ग्रामसेवक सरपंच अशोक जाधव सत्तार पटेल जिल्हा काँग्रेस अल्पसंख्यांक अध्यक्ष मजहर पटेल पोलीस पाटील रायभान सोनवणे वसीम शहा इमाम शहा गफूर शहा यांचे सह ग्रामस्थांच्या उपस्थितीत सर्वानुमते शांतता ठेवण्यात येईल एकमताने सांगितलेले की दोन्ही समाज हिंदू मुस्लिम समाज बांधव यांचा एकोपासुन आम्ही भाई चालणे राहतो झालेल्या गोष्टीशी आमचा काही एक संबंध नाही त्यामुळे झालेल्या चर्चेअंती दोन्ही झेंड्यांचा मान सन्मान करीत काढून ग्रामपंचायत कार्यालयात सुरक्षित ठेवण्यात आले व यापुढेही कसलाही अनुचित प्रकार घडणार नाही अशी त्या समाज बांधवांनी ग्वाही सर्वांसाठी दिली.

त्यामुळे सर्व वादांवर पडदा पडला असून पुन्हा शांततेत राहू असे सर्वांमध्ये ठरले प्रशासनाने ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले तर ग्रामस्थांनी वरिष्ठांचे अभिनंदन केले.

# पालिकेच्या त्या खुलाश्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** नगर पालिकेने महाराजा अग्रसेन चौक सुशोभिकरण कामाबाबत करण्यात आलेल्या रु. १० लक्षच्या अपहारा बाबत खुलासा दि ५ मार्च २०२३ रोजी काढला आहे. त्या खुलाश्याची चौकशी करण्याची मागणी परतूर पत्रकारांच्या वतीने उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नगर पालिकेने महाराजा अग्रसेन चौक सुशोभिकरण कामाबाबत करण्यात आलेल्या रु. १० लक्षच्या अपहारा बाबत खुलासा दि ५ मार्च २०२३ रोजी काढला आहे दि ५ मार्च २०२३ रोजी काढलेला खुलासा या दिवशी रविवार सुट्टीचा दिवस आहे. आणि तसेच सदरील खुलाश्यावर नगर पालिकेचा शिक्का मारलेला नाही. नगरपालिका मुख्याधिकारी यांनी काढलेल्या खुलाश्यावर पालिका मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी आहे. ती स्वाक्षरी खरी आहे का खोटी. तसेच खुलासा काढण्यासाठी नगर पालिका रविवारी सुरू असते का ? नगर पालिका मुख्याधिकारी यांनी कोणात्या राजकीय पक्षाच्या नेत्याच्या दबावाखाली पत्र काढून खुलासा काढला. आणि हे खुलाश्याचे पत्र सोशलमीडियावर व्हायरल कोणी केले. तसेच नगर पालिकेने पत्रकार परिषद घेऊन खुलासा करण्या एवजी कोणाच्या माध्यमातून खुलाशाचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल केले. या सर्व प्रकरणाची सर्व बाजूने चौकशी करून आठ दिवसात दोषीवर कडक कारवाई करावी. नसता पत्रकार संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर अजय देसाई, आशीष गारकर, सागर काजळे, भारत सवने, सुरेश कवडे, प्रभाकर प्रधान, प्रमोद बिल्हारे, कैलास चव्हाण, सुरेश काळे, माणिक जैस्वाल, संजय देशमाने, तारेख शेख, मुमताज अंसारी, सय्यद वाजेद आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in